दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २२०) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.०१ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## पूर्व विदर्भात अतिवृष्टीचा अंदाज, सप्टेंबर महिन्यात बहुतांश जिल्ह्यात पावसाची तूट राहण्याचा अंदाज

मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- भारतीय हवामान विभागानं सप्टेंबर महिन्यात पावसाची स्थिती कशी राहील यासंदर्भातील अंदाज वर्तवला आहे. सध्या संपूर्ण राज्यात सरासरी पेक्षा पाऊस कमी आहे. प्रत्येक जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला असल्याचं सुषमा नायर यांनी सांगितलं. सप्टेंबर महिन्यात देखील बहुतांश जिल्ह्यात पावसाची तूट अशीच कायम राहील. सध्या एक कमी दाबाचा क्षेत्र निर्माण झालं असून त्यामुळे पूर्व विदर्भात अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे, असं हवामान विभागानं सांगितलं आहे.

प्रत्येक जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. पूर्ण राज्यात सरासरीपेक्षा पाऊस कमी आहे. ऑगस्ट महिन्यात मराठवाड्यात ६९% पावसाची तूट आहे तर विदर्भात ५८% पाऊस कमी झाला तर सरासरी तूट ही ४६% आहे. ऑगस्ट महिन्यात मुंबईत देखील - ३३ टक्के पाऊस झाला कारण अशीच कोणतीही सिस्टीम नव्हती ज्याने पाऊस पडेल, असं सुषमा नायर म्हणाल्या. एक दोन वेळेला वातावरण निर्माण होण्याची शक्यता होती मात्र महाराष्ट्राच्या अंतर्गत भागात पाऊस पडेल अशी स्थिती निर्माण न झाल्यामुळे पावसाची एवढी तूट सध्या दिसते आहे. पाऊस पडेल अशी स्थिती निर्माण झाली नाही. जुलै पर्यंत पाऊस चांगला होता कोकण किनारपट्टी वरती अधिक पाऊस झाला म्हणून संपूर्ण पावसाळ्यात थोडाफार पाऊस झाल्याचे दिसते. मात्र, तरी मराठवाडा आणि विदर्भाच्या बहुतेक जिल्ह्यांमध्ये तूट आहे.

## मराठा समाजाने १२ तारखेपर्यंत मुंबईला जावे; मनोज जरांगेंची घोषणा



जालना दि.३१ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज तिसरा दिवस असून, सरकारच्या अधिकृत शिष्टमंडळाची प्रतीक्षा अद्याप कायम आहे. इकडे उपोषणाचा तिसरा दिवस उजाडला तरी सरकारकडून कोणतीही ठोस चर्चा झाली नसल्याने मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला मुंबई कूच करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, ''आम्ही मुंबईला जायची तयारी करतोय. मराठा समाजाला सांगतो १२ सप्टेंबरपर्यंत हळूहळू मुंबईला जा. आपल्या सोयीनुसार तिथे राहा, फक्त आझाद मैदानावर जाऊ नका. आझाद मैदान, इतर कोणतेही मैदान किंवा थेट मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान असलेल्या 'वर्षा' बंगल्यापैकी नेमके कुठे जमायचे, याचा निरोप मी स्वतः तुम्हाला देईन. तो निरोप मिळताच सगळ्यांनी त्या ठिकाणी एकत्र यायचे आहे, अशी रणनीती जरांगे पाटील यांनी जाहीर केली आहे. मराठे मुंबईत आलेले त्यांना कळले नाही पाहिजे. पाहुणे, मित्र यांच्याकडे राहा. पोलिसांनी तुम्हाला जर उचलून नेले तर बिनधास्त पोलीस स्टेशनला जा, उलट तिथे चांगली सोय होते. उपोषण सोडणार नाही, मी बरोबर मुंबईत जातो, अशी घोषणा त्यांनी केलीय.

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, सगळे सोबत जाणे शक्य नाही. सरकारकडून कोणीही संपर्क साधलेला नाही. आमचे १२ तारखेला ठरल्यावर जाणार. गणेशोत्सव आपला आहे, आम्ही ११ दिवस गणपती बसवतो ते दीड दिवस बसवतात आणि ते आम्हाला देव-देव शिकवतात, आमच्या एवढं पुण्य कोण करतं,'' असे देखील त्यांनी म्हटले. मंत्री उदय सामंत यांच्या संभाव्य दौऱ्यावर आणि सरकारच्या संपर्कावर प्रतिक्रिया देताना जरांगे पुढे म्हणाले, ''२४ तासात संपर्क साधू म्हणजे पावसासारखं आहे का, हळूहळू सरी पडणार. पोराहो आपले मुंबईचे सुरू करा,'' असे त्यांनी म्हटले.

आपण विरोध केल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी दौरा रद्द केला होता, मात्र पुन्हा १० मिनिटांमध्ये कोणत्यातरी अधिकाऱ्याने जरांगे पाटलांनी सूट दिली आहे असा मेसेज दिल्याने ते परभणीला आल्याचा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला. ते म्हणाले की, ''आम्ही जर भिडलो असतो तर एकनाथ शिंदे साहेबांना पळायला सुद्धा जागा राहिली नसती'', असं सुद्धा मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, उपोषणस्थळी वडीगोद्री प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभम राठोड व त्यांच्या पथकाने जरांगे यांची तपासणी केली. तपासणीत त्यांची शुगर कमी झाल्याचे समोर आल्याने डॉक्टरांनी त्यांना सलाईन लावण्याचा सल्ला दिला. मात्र, जरांगेंनी उपचार घेण्यास नकार दिला. त्यानंतर दुपारी आणि सायंकाळी गेलेल्या वैद्यकीय पथकालाही त्यांनी माघारी पाठवले. सध्या त्यांचा रक्तदाब, नाडीचे ठोके आणि ऑक्सिजनची पातळी स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आज तिसरा दिवस असून, त्यांच्या प्रकृतीकडे सरकारचे लक्ष आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीवर तोडगा काढण्यासाठी सरकारचे शिष्टमंडळ पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेण्याची शक्यता आहे. यापूर्वी झालेल्या चर्चेनंतरही आंदोलन सुरूच असल्याने सरकारकडून पुढील चर्चेसाठी हालचाली सुरू झाल्याचे समोर येत आहे. त्यामुळे या भेटीत काय तोडगा निघतो, याकडे लक्ष लागले आहे.

## मुंबईऐवजी जरांगेंच्या आंदोलनाचा केंद्रबिंदू दिल्लीकडे; अॅड. प्रकाश आंबेडकर यांचा दावा



पुणे दि.३१ (प्रतिनिधी)- 'मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्या आंदोलनाची दिशा आणि आंदोलनाचे केंद्र बदलले असून, पूर्वी मुंबई आणि ठाण्याभोवती असलेले आंदोलनाचे केंद्र आता दिल्लीकडे सरकले आहे. गरीब मराठ्यांच्या प्रश्नापेक्षा सत्तेच्या राजकारणातील पटावरचा खेळ या आंदोलनात अधिक असल्याचे दिसत आहे,' असा दावा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी पत्रकारांशी बोलताना केला. बेरोजगार आणि त्रस्त तरुण मराठा वर्गाने कोणाच्या नादी लागू नये, असे आवाहनही त्यांनी केले. 'जरांगे यांना पाठिंबा देणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, भाजप आणि शिवसेनेतील मराठा नेत्यांनी ही मागणी कधीच मान्य होणार नाही, हे सांगण्याची हिंमत दाखवावी.''

आंबेडकर म्हणाले, ''मागण्याच अशा करायच्या की ज्या मान्यच होणार नाहीत आणि त्यातून डोके भडकवण्याचे काम सुरू ठेवायचे, या गोष्टीला आता आळा बसला पाहिजे. सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेपणा सिद्ध करण्यासाठी आवश्यक माहिती आणि आकडेवारी सरकारने न्यायालयासमोर ठेवावी. ती घटनेच्या चौकटीत आहे की नाही, याची तपासणी करून न्यायालय निर्णय देईल. मात्र, कोणत्यातरी प्रवर्गात जाऊन आरक्षण मागताना त्या प्रवर्गाचे निकष पूर्ण करावे लागतात. ओबीसी नेत्यांमध्ये एकवाक्यता नसल्याचे दिसत असले तरी, लढणारा ओबीसी वर्ग आणि ओढून-ताणून ओबीसींचे नेतृत्व करणारा वर्ग वेगळा आहे. त्यामुळे ओबीसी नेत्यांनीच या प्रश्नावर अधिक बोलणे योग्य ठरेल.'

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांचे अमेरिकेतील भाषण ऐकले असेल. आपण सर्वांना सोबत घेऊन चालतो, असे जगाला सांगायचे आणि भारतात आल्यानंतर एकमेकांना दूर लोटायचे, अशी दुटप्पी भूमिका चळवळीत आणि राजकारणात असू नये,' अशी टिप्पणी आंबेडकर यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळालेल्या पुरस्काराबाबत 'भारतामध्ये एक पुरस्कार घेता आला नाही आणि छोट्या देशांना धमकावून पुरस्कार घेत आहेत,' अशी टीका आंबेडकर यांनी केली.

## सीजेपीच्या मोर्चाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

नवी दिल्ली दि.३१ (वृत्तसंस्था)- सर्वोच्च न्यायालयाने कॉकरोच जनता पार्टीचा ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत होणारा प्रस्तावित मोर्चा थांबवण्यास नकार दिला आहे. १२-१३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेनंतरपर्यंत स्थगिती देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, सध्या कोणतीही अनुचित घटना घडेल असे मानण्यास कोणतेही सबळ कारण नाही. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी म्हटले आहे की, प्रशासनाकडून कायदा व सुव्यवस्था राखण्याची आणि सर्व पक्ष शांततेने, जबाबदारीने व कायद्यानुसार वागतील याची खात्री करण्याची अपेक्षा आहे. संभाव्य अनुचित घटनेच्या भीतीने याचिकाकर्त्याने न्यायालयाच्या हस्तक्षेपाची मागणी केली होती. सर्वोच्च न्यायालयाने तात्काळ हस्तक्षेप करण्यास नकार दिला आणि याचिकाकर्त्याला आपली बाजू केंद्र सरकारसमोर मांडण्याचे व याचिकेची एक प्रत सॉलिसिटर जनरल यांना देण्याचे निर्देश दिले. या याचिकेवर १० सप्टेंबर रोजी मुख्य खटल्यासोबत सुनावणी होणार आहे. एका निवृत्त पोलीस अधिकाऱ्याच्या वतीने दाखल केलेल्या या याचिकेसाठी वकील सय्यद रिझवान हजर होते.

अभिजीत दीपके यांच्या सीजेपी पक्षाने केंद्र सरकारवर आश्वासने मोडल्याचा आरोप केला आहे. २४ ऑगस्ट रोजी सीजेपीने म्हटले की, २५ जुलै रोजी तरुणांना दिलेली आश्वासने, विशेषतः विद्यार्थी आणि आंदोलकांविरुद्ध दाखल केलेले एफआयआर मागे घेण्यासंबंधीची आश्वासने पूर्ण करण्यात सरकार अपयशी ठरल्याचा आम्ही तीव्र निषेध करतो. पक्षाने म्हटले, ''आश्वासने पूर्ण करण्यात सरकारकडून होणारा सततचा विलंब आणि दिरंगाई लक्षात घेता, सीजेपी राष्ट्रीय कार्यकारिणी समितीने लोकांना शांततापूर्ण मार्गाने संघटित करण्याची मोहीम पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ५ सप्टेंबर रोजी, सीजेपी नवी दिल्लीतील इंडिया गेटपासून दिल्ली पोलीस मुख्यालयापर्यंत एका शांततापूर्ण युवा मोर्चाचे आयोजन करेल.''

## महाराष्ट्रातील २ कोटी ६ लाख ८८ हजार ४८७ मतदारांची नावे वगळली

### निवडणूक आयोगाकडून अंतर्गत प्रारुप मतदार यादी जाहीर

मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- राज्यातील मतदारांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर येत आहे. राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने 'विशेष सखोल पुनरीक्षण २०२६' अंतर्गत राज्याची नवी प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मात्र, या यादीतून राज्यातील तब्बल २ कोटींपेक्षा जास्त मतदारांची नावे वगळण्यात आल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

सखोल पुनरीक्षणाची ही प्रक्रिया राबवण्यापूर्वी राज्यात एकूण ९,७८,५४,०४९ नोंदणीकृत मतदार होते. परंतु, नव्याने प्रसिद्ध झालेल्या मसुद्यात ७,७१,६५,५६२ (७८.८६टक्के) मतदारांचाच समावेश करण्यात आला आहे. म्हणजेच गणना प्रपत्र न मिळाल्यामुळे, गैरहजर असणे, स्थलांतर, मृत्यू किंवा दुबार नोंदणीमुळे तब्बल २,०६,८८,४८७ (२१.१४टक्के) मतदारांची नावे सध्याच्या यादीत समाविष्ट झालेली नाहीत.

या नव्या प्रारुप यादीत पुरुष मतदारांची संख्या ३,९५,८९,९०५ इतकी आहे, तर महिला मतदारांची संख्या ३,७५,७२,५७० एवढी नोंदवण्यात आली आहे. याशिवाय ३,०८७ तृतीयपंथी मतदारांचा यादीत समावेश आहे. तुमचे नाव मतदार यादीत सुरक्षित आहे की नाही, हे तपासणे आता प्रत्येक नागरिकासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

मतदारांनी त्यांचे नाव निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या मसुद्यात आहे की नाही हे तपासण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर भेट द्यावी. या लिंकवर जाऊन प्रारुप मतदार यादी २०२६ यावर आपले नाव तपासावे.

वगळण्यात आलेल्या किंवा नवीन नाव नोंदवू इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी निवडणूक आयोगाने महत्त्वाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. नागरिकांना आपले नाव तपासण्यासाठी आणि दावे व हरकती नोंदवण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ पर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. यानंतर सर्व अर्जांची छाननी करून ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणारे नवमतदारही यासाठी पात्र ठरणार आहेत.

या पुनरीक्षण प्रक्रियेदरम्यान मतदान केंद्रांची पुनर्रचना आणि सुसूत्रीकरणही करण्यात आले आहे. आधी राज्यात १,००,२५३ केंद्रे होती, त्यातील ४३१ केंद्रे कमी करून व ३९४ नवीन केंद्रे जोडून आता एकूण १,००,२१६ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

मतदारांच्या सोयीसाठी आणि सुरक्षेच्या दृष्टीने १,४०३ मतदान केंद्रांचे स्थळ बदलण्यात आले असून, त्यांना तात्पुरत्या रचनेवरून पक्क्या आणि सुरक्षित इमारतींमध्ये हलवण्यात आले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक मतदाराने आपले नाव आणि मतदान केंद्र तात्काळ तपासून घेणे गरजेचे आहे.

## युवक काँग्रेसचे भाजप कार्यालयाबाहेर आंदोलन, दादरमध्ये मनुस्मृतीचे दहन

मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या हल्द्वानी येथील सभेनंतर सभास्थळाचे 'शुद्धीकरण' करण्यात आल्याच्या घटनेचा मुंबई युवक काँग्रेसने तीव्र निषेध केला. भाजप-आरएसएसच्या कथित जातीयवादी आणि मनुवादी मानसिकतेविरोधात मुंबई युवक काँग्रेस अध्यक्षा झीनत शबरीन यांच्या नेतृत्वाखाली दादर येथील भाजप कार्यालयासमोर जोरदार आंदोलन करण्यात आले. यावेळी युवक काँग्रेस कार्यकर्त्यांनी मनुस्मृतीच्या प्रती जाळून भाजप-आरएसएसच्या मनुवादी विचारसरणीचा निषेध केला. भाजप कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत जातीयवादी मानसिकतेविरोधात आपला संताप व्यक्त केला.

यावेळी झीनत शबरीन म्हणाल्या की, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या सभेनंतर सभास्थळाचे 'शुद्धीकरण' करणे ही जातीयवादी मानसिकतेची पराकाष्ठा आहे. हा केवळ मल्लिकार्जुन खर्गे यांचा अपमान नसून देशातील कोट्यवधी दलित, वंचित आणि शोषित नागरिकांचा अपमान आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिलेला असताना जात-पात आणि अस्पृश्यतेच्या मानसिकतेला खतपाणी घालणाऱ्या प्रवृत्तींविरोधात युवक काँग्रेस सातत्याने लढा देत राहील. भारतीय संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा अधिकार दिला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा असलेल्या महाराष्ट्रात जातीय भेदभाव आणि मनुवादी विचारसरणीला कोणतेही स्थान नाही. संविधानाच्या मूल्यांचे रक्षण आणि सामाजिक समतेसाठी युवा काँग्रेसचा संघर्ष अधिक तीव्र केला जाईल, असा निर्धार झीनत शबरीन यांनी यावेळी व्यक्त केला.

## मराठा समाजाला न्याय देण्याची सरकारची भूमिका, चर्चेतूनच मार्ग काढू-अशोक चव्हाण

मुंबई दि.३१ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मनोज जरांगे पाटील यांनी आपले ११ वे आमरण उपोषण सुरू केले असून, दुसरीकडे ओबीसी समाजानेही उपोषणाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करत, संघर्षाचा मार्ग सोडून चर्चेतून मार्ग काढण्याचे आवाहन केले आहे. ''समाजाला न्याय देण्याची शासनाची भूमिका असून, सरकारने जरांगेंच्या मागण्यांना वेळोवेळी प्रतिसाद दिलेला आहे,'' असे चव्हाण यांनी स्पष्ट केले.

मनोज जरांगे पाटील यांनी राज्यातील जातपडताळणी समित्या रद्द करण्याची नवी मागणी पुढे केली आहे. यावर भाष्य करताना अशोक चव्हाण म्हणाले की, शासनाने आरक्षणाचा विषय बऱ्यापैकी पूर्ण केला आहे. जातपडताळणी ही कुठल्या एका विशिष्ट समाजासाठी किंवा केवळ मराठा समाजालाच लागू नाही. एससी, एसटी आणि ओबीसी अशा सर्वच प्रवर्गांसाठी जातपडताळणीची प्रक्रिया अस्तित्वात असते.

जरांगे पाटील यांच्या ११व्या उपोषणाबाबत बोलताना चव्हाण म्हणाले की, सरकारने त्यांच्या मागण्यांना प्रतिसाद दिला असल्यामुळे, थेट उपोषणाचा मार्ग स्वीकारण्याअगोदर चर्चेची एक बैठक व्हायला हवी होती. आंदोलनामुळे लोकांची गैरसोय होऊ नये याची काळजी घेणे आवश्यक आहे. शासनाने समाजाला न्याय देण्याची भूमिका स्वीकारलेलीच आहे, त्यामुळे संघर्षाचा मार्ग सोडायला हवा.

एकीकडे जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू असताना, ओबीसी समाजानेही आंदोलनाचा इशारा दिला आहे. यावर बोलताना चव्हाण यांनी सामंजस्याची भूमिका मांडली. हा विषय आता दोन्ही बाजूंकडून तसाच पुढे येत आहे. त्यामुळे हा संघर्ष आणखी वाढवण्याऐवजी, दोन्ही बाजूंशी संवाद साधून चर्चेतूनच मार्ग काढणे योग्य ठरेल, असा विश्वास अशोक चव्हाण यांनी व्यक्त केला.

## नेपाळच्या पुरात महाराष्ट्रातले ६७ जण अद्यापही बेपत्ता

नवी दिल्ली दि.३१ (वृत्तसंस्था)- नेपाळ-तिबेट प्रदेशात २६ ऑगस्ट २०२६ रोजी आलेल्या महापुरामध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील पर्यटक व नागरिकही अडकले आहेत. यातील ६७ जणांचा संपर्क व शोध घेण्यासाठी शर्थीचे प्रयत्न चालू आहेत. महाराष्ट्रातील एकूण बाधित नागरिक संख्या ४०५ आहे. यापैकी २६२ नागरिकांना राज्यात आणण्यासाठी यशस्वी कार्यवाही होत असून उर्वरित ७६ संपर्कात असून सुरक्षित आहेत.

संपर्क होऊ शकला नाही अशा पर्यटक नागरिकांच्या शोधासाठी केंद्र सरकारचे विशेष पथक काठमांडू येथे दाखल झाले आहे. भारताचे नेपाळमधील राजदूत यांनी देखील या पथकाची भेट घेऊन आवश्यक सूचना दिल्या आहेत. आपत्तीमुळे बाधित नागरिकांशी संपर्क साधून त्यांच्या सुरक्षिततेची माहिती घेण्याबरोबरच त्यांना मायदेशी परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनांनुसार प्रवासातील अडचणी दूर करण्याबरोबरच विविध प्रकारची मदत उपलब्ध केली जात आहे.

रिचा टूर्स प्रा. लि. या संस्थेमार्फत गेलेल्या ६० नागरिकांच्या गटाशी अद्याप थेट संपर्क प्रस्थापित झालेला नाही तसेच अन्य ७ नागरिकांची लिंकद्वारे नोंद झाली असून त्यांच्याशीही अद्याप संपर्क होऊ शकलेला नाही. या व्यक्तींचा ठावठिकाणा व माहिती मिळविण्याचे प्रयत्न प्रशासनाकडून सुरू आहेत. मुख्यमंत्री कार्यालय आणि प्रशासन बाधित पर्यटक व नागरिक राज्यात सुरक्षितरित्या पोहोचावे यासाठी यावर सातत्याने लक्ष ठेवून आहे.

## मानवतेच्या भल्यासाठी युद्ध घातक; युद्ध संपवलेच पाहिजे

### बिश्केकमध्ये पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची भेट

बिश्केक दि.३१ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची किर्गिझस्तानची राजधानी बिश्केक येथे भेट झाली. या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदींनी पुतिन यांना युद्ध थांबवण्याचे आवाहन केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, युद्ध हे मानवतेला धोका आहे आणि भारताने नेहमीच शांततेचे समर्थन केले आहे. मानवतेच्या भल्यासाठी युद्ध कोणत्याही परिस्थितीत संपवलेच पाहिजे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, सर्व प्रश्न शांततेनेच सोडवले पाहिजेत. आपण युद्धाच्या समाप्तीकडे वाटचाल केली पाहिजे, कारण युद्धाचा प्रत्येक दिवस मानवतेच्या कल्याणाला मागे ढकलतो.बुद्ध आणि गांधींच्या आदर्शांचे पालन करणारा देश म्हणून भारत नेहमीच शांततेच्या बाजूने राहिला आहे, असेही मोदी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुतिन यांना म्हणाले, 'तुमचा गेल्या वर्षीचा भारत दौरा खूप यशस्वी आणि संस्मरणीय होता. आमच्यासाठी ही अत्यंत समाधानाची बाब आहे की आमचे सहकार्य नव्या उंचीवर पोहोचत आहे आणि आम्ही दोन्ही देशांतील लोकांच्या कल्याणासाठी एकत्र काम करत आहोत. राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन पुढे जाणे, हाच आमचा दोघांचा विचार राहिला आहे आणि भविष्यातही तोच आमचा मुख्य मंत्र राहील.

या बैठकीदरम्यान, पंतप्रधान मोदी आणि रशियाच्या राष्ट्राध्यक्षांनी ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर संरक्षण सहकार्य, ऊर्जा पुरवठा, व्यापारी संबंध, खत पुरवठा आणि प्रमुख भू-राजकीय मुद्द्यांवर चर्चा केली. रशियाच्या राष्ट्राध्यक्षांना भेटून पंतप्रधान मोदींनी आनंद व्यक्त केला. युक्रेनच्या मुद्द्यावर भारत सर्व शांततापूर्ण प्रयत्नांना पाठिंबा देतो आणि यापुढेही देत राहील. भारत सर्व समस्यांच्या शांततापूर्ण निराकरणाचे समर्थन करतो, जे संपूर्ण मानवतेसाठी आवश्यक आहे. सप्टेंबरमध्ये ब्रिक्स शिखर परिषदेसाठी राष्ट्राध्यक्ष पुतिन यांचा नवी दिल्ली दौरा रशिया आणि भारत यांच्यातील संबंध अधिक दृढ करेल, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

## सीजेपी म्हणजे काँग्रेस जिताओ पार्टी, भारत जोडोमधील ८० संघटना त्यात सामील-मुख्यमंत्री

पुणे दि.३१ (प्रतिनिधी)- विरोधकांकडे आपल्या विचारसरणीला विरोध करण्याची क्षमता संपली आहे, म्हणून आता काही मुद्द्यांवरून ते दंगा करतील, हिंदू समाज कसा चुकीचा आहे हे सांगत बसतील, अशी टीका राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. हिंदू धर्माला बदनाम करणाऱ्यांचे पुढचे टार्गेट आता कुंभमेळा आहे, असंही ते म्हणाले. पुण्यामध्ये भाजपच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मार्गदर्शन केलं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी कॉकरोच जनता पार्टी म्हणजे सीजेपीवर देखील टीका केली.

सीजेपी ही केवळ छोटीशी संघटना नाही. सीजेपी म्हणजे काँग्रेस जिताओ प्रोग्रॅम आहे. या संघटनेत भारत जोडोमधील ८० संघटना सामील आहेत, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी केली. पुण्यातील डीजेच्या मुद्द्यावरून वाद निर्माण झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्यावर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, डीजेच्या वादात न पडता सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करा. सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याची क्षमता फक्त पुण्यातच आहे. विरोधकांवर टीका करताना मुख्यमंत्री म्हणाले की, ''आपली विचारसरणी हिंदुत्वाची आहे. हिंदुत्वाला यांनी विरोध केला, राम मंदिराला विरोध केला. पण राम मंदिराला विरोध केल्यामुळे जनतेने यांना घरी बसवलं. आता यांच्या लक्षात आलं की विचारसरणीला विरोध करून फायदा नाही. मग यांनी राम मंदिरातील दानपेटीतील काही प्रमाणात घोटाळा झाला हे सत्य आहे. मात्र सगळं मंदिरच लुटल्याचा आव विरोधकांनी आणला आणि त्यावर नॅरेटिव्ह पसरवण्याचा प्रयत्न केला. हिंदुत्वाला विरोध करता येत नाही तर हिंदू कशा चुका करतात, त्यांच्या मंदिरात कशा चुकीच्या गोष्टी होतात, हे सांगत बसतात. यांचे पुढचे टार्गेट हे कुंभमेळा आहे.''

राहुल गांधी यांच्यावर टीका करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''महिला आरक्षणाला विरोध करणारे कांग्रेस आणि त्यांचे घटकपक्ष होते. आधी पाठिंबा दिला होता तर आता विरोध का? महिला आरक्षणाचे खरे हत्यारे राहुल गांधी हेच आहेत. महिला आरक्षण कायद्याचा राहुल गांधींनी शिरच्छेद केला. राहुल गांधी रोज खोटं बोलतील. मात्र आपण सत्य घेऊन जनतेत गेलो तर जनतेला ते माहिती होईल. स्वातंत्र्यानंतर कांग्रेसने शौचालयं बांधली नव्हती, ती पंतप्रधान मोदींनी बांधली. महिलांची बँक अकाऊंट काढली, बेटी बचाव बेटी पढाओ घोषणा देणारे मोदीजी आहेत. महिलांना लखपती दीदी करणारे पंतप्रधान आहेत. झूट की गुंज बंद करो राहुल गांधी. मला माझ्या नेत्यावर विश्वास आहे, २०२९ ला ते महिला आरक्षण आणतील.'' असे फडणवीस म्हणाले.

## मोदी सरकारच्या काळात ओबीसींवर मोठा अन्याय-विजय वडेट्टीवार

नागपूर दि.३१ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात ओबीसी समाजावर प्रचंड मोठा अन्याय होत आहे. २०१६ मधील यूपीएससी परीक्षेत मेरिटवर उत्तीर्ण झालेल्या तब्बल ३१४ ओबीसी विद्यार्थ्यांना नॉन-क्रिमीलेअरच्या अटीचे कारण दाखवून आयएएस आणि आयपीएस होण्यापासून रोखण्यात आले, असा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. हे सरकार मनुवादी विचारांचे असून त्यांना बहुजन अन् ओबीसी समाजाशी काहीही देघेणे नाही.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, २०१६ मध्ये युपीएससीची परीक्षा झाली आणि जवळपास ३१४ विद्यार्थी ओबीसीमधून पास झाले त्यांना तुम्ही क्रिमिनेअरच्या अटीमध्ये बसत नाही मर्यादेच्या आतमध्ये तुम्ही नाही म्हणत त्यांनी आयएएस आणि आयपीएस होण्यापासून वगळण्यात आले, त्यांना जॉईन होऊ दिले नाही. ही सर्व मुले मिरीटवर सिलेक्ट होऊ शकली असती पण तसे करण्यात आले नाही. ओपनच्या कमी मार्क असलेल्या मुलांना युपीएससीच्या परीक्षेत पास करण्यात आले आणि त्यांना प्रशासकीय पदांवर रुजू करण्यात आले. हे सरकार मनुवादी विचारांचे सरकार आहे त्यांना बहुजन आणि ओबीसींचे काही देणंघेणं नाही.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, मोहन भागवत यांना देशात बोलण्याची संधी नाही ते न्युयार्कमध्ये जाऊन बोलतात. आमच्या पक्षाचे अध्यक्ष एक कार्यक्रम घेतात तिथे जात शुद्धीकरण करण्यात येते त्यावर अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला पाहिजे. राहुल गांधी यांनी यावर आवाज उठवला तर त्यांच्यावर टीका करतात त्यांच्यावर गुन्हा दाखल करतात हे चुकीचे आहे. राहुल गांधी यांचा आवाज तुम्ही असे गुन्हे दाखल करत दाबू शकत नाही. काँग्रेस सरकार असताना हिंदूंना कधी भीती वाटली नाही. पण आता वाटत आहे हे बोगस लोकं आहेत. हिंदू म्हणणाऱ्या लोकांनी जिन्नासोबत निवडणूक का लढवली. सर्व धर्मांच्या लोकांना आपल्या धर्मासाठी काम करता आले पाहिजे. धार्मिक तेढ निर्माण करणे हा गुन्हा असावा अशी भूमिका घेतली पाहिजे. देशाची परिस्थिती गेल्या १२ वर्षांमध्ये अतिशय खराब झाली आहे. केवळ विश्वगुरू म्हणून काही होत नसते, केवळ बोलून काही होत नसते त्यासाठी काम करावे लागते असे वडेट्टीवार म्हणाले.

# महापूर, भूस्खलन आणि हिमनद्यांचे संकट

हिमालय म्हणजे केवळ जगातील उंच पर्वतरांग नव्हे; तो दक्षिण आशियाच्या जीवनाचा आधार आहे. गंगा, ब्रह्मपुत्रा, सिंधूसह असंख्य नद्यांचे उगमस्थान असलेला हिमालय भारत, नेपाळ, भूतान, चीन आणि बांगलादेशच्या पर्यावरणीय, आर्थिक आणि सामाजिक जीवनाशी जोडलेला आहे. त्यामुळे हिमालयाच्या कुशीत घडणारी कोणतीही मोठी नैसर्गिक घटना ही एका देशापुरती मर्यादित राहत नाही. तिचे पडसाद सीमापार उमटतात.

नेपाळमध्ये अलीकडे आलेल्या विनाशकारी महापुराच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. अतिवृष्टी, अचानक आलेले पूर, भूस्खलन, हिमनदीय तलाव फुटण्याचा धोका आणि वेगाने बदलणारे हवामान यामुळे हिमालयीन प्रदेशाची असुरक्षितता वाढत आहे. या घटनांकडे केवळ एखाद्या देशातील नैसर्गिक आपत्ती म्हणून पाहणे धोकादायक ठरेल. हिमालयाचा इशारा हा संपूर्ण दक्षिण आशियासाठी आहे.

हिमालयातील एखाद्या दुर्गम खोऱ्यात झालेली अतिवृष्टी काही तासांत नदीला रौद्ररूप देऊ शकते. डोंगराचा उतार कोसळून नदीचा प्रवाह अडला, तर त्यामागे पाणी साचून तात्पुरते नैसर्गिक सरोवर तयार होऊ शकते. हा अडथळा फुटला तर अचानक मोठ्या प्रमाणात पाणी खालील खोऱ्यात धावू शकते. याशिवाय हिमनद्यांच्या मागे हटण्यामुळे किंवा वितळण्याच्या प्रक्रियेत बदल झाल्यामुळे काही भागांत हिमनदीय तलाव निर्माण होण्याचा धोका वाढतो. अतिवृष्टी, हिमस्खलन, भूस्खलन किंवा इतर कारणांमुळे अशा तलावांचा नैसर्गिक बांध फुटल्यास 'ग्लेशियल लेक आउटबर्स्ट फ्लड' अर्थात हिमनदीय तलाव फुटून येणारा अचानक पूर निर्माण होऊ शकतो.

हिमालयाच्या उंचसखल भूप्रदेशामुळे अशा पुराला प्रचंड वेग मिळू शकतो. त्यामुळे वरच्या खोऱ्यातील आपत्तीचा परिणाम खालच्या भागातील गावांपर्यंत अत्यंत कमी वेळात पोहोचू शकतो.

नेपाळमधील अनेक नद्या पुढे भारतात प्रवेश करतात. कोसी, गंडक, कर्णाली आणि महाकाली यांसारख्या नदीप्रणालींच्या प्रवाहाचा परिणाम भारतातील मोठ्या प्रदेशावर होतो. बिहार, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पश्चिम बंगाल आणि इतर भागांना हिमालयीन नदीप्रणालीच्या बदलांचा थेट किंवा अप्रत्यक्ष फटका बसू शकतो.

विशेषतः बिहारला कोसीच्या पुराचा इतिहास मोठा आहे. म्हणूनच हिमालयात होणाऱ्या अतिवृष्टीकडे किंवा भूस्खलनाकडे केवळ नेपाळचा अंतर्गत प्रश्न म्हणून पाहता येणार नाही.

वरच्या प्रवाहातील पाण्याचा वेग, धरणातून होणारा विसर्ग, भूस्खलनामुळे नदीचा मार्ग बदलणे किंवा अचानक आलेला पूर यापैकी कोणतीही घटना खालच्या प्रवाहातील लाखो लोकांच्या जीवनावर परिणाम करू शकते.

म्हणून भारत आणि नेपाळमधील सहकार्य केवळ जलवाटप, धरणे किंवा जलविद्युत प्रकल्पांपुरते मर्यादित न राहता रिअल-टाइम हवामान माहिती, नदीपातळी, धरणातील पाणीसाठा, विसर्ग, भूस्खलन आणि पूरपूर्व सूचना या सर्व बाबींमध्ये अधिक प्रभावी झाले पाहिजे.

गंगा-ब्रह्मपुत्रा-मेघना नदीप्रणालीचा अंतिम मोठा भाग बांगलादेशमध्ये येतो. त्यामुळे हिमालयीन प्रदेशातील पाऊस, नदीचा प्रवाह आणि विविध जलघडामोडींचा परिणाम या देशावरही होतो. बांगलादेशसमोर आधीच समुद्रपातळी वाढ, किनारी चक्रीवादळे आणि नदीपूर अशी अनेक आव्हाने आहेत. त्यात वरच्या प्रवाहातून अचानक मोठ्या प्रमाणात पाणी आले, तर परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. म्हणूनच दक्षिण आशियातील जलव्यवस्थापनाला राष्ट्रीय सीमांच्या चौकटीत बंदिस्त ठेवणे आता पुरेसे ठरणार नाही. एकाच नदीखोऱ्यातील देशांनी एकत्रित जोखीम व्यवस्थापन करणे ही काळाची गरज आहे.

हिमालयातील संकटामागे केवळ अतिवृष्टी किंवा भूस्खलन नाही. हवामानबदलामुळे पर्वतीय परिसंस्थांमध्ये होणारे बदलही महत्त्वाचे आहेत. तापमानातील वाढ, हिमनद्यांचे मागे हटणे, बर्फाच्या स्वरूपात होणारे बदल आणि पर्जन्यमानातील अनिश्चितता यामुळे हिमालयीन प्रदेशातील नैसर्गिक समतोलावर परिणाम होत आहे.त्याचवेळी वातावरणातील उष्णता वाढल्याने अधिक जलवाष्प धारण करण्याची क्षमता वाढू शकते. परिणामी काही परिस्थितींमध्ये कमी कालावधीत अतिवृष्टी होण्याचा धोका वाढतो. सपाट प्रदेशापेक्षा हिमालयासारख्या तीव्र उताराच्या प्रदेशात अशा पावसाचे परिणाम अनेक पटींनी तीव्र होऊ शकतात. अतिवृष्टी, भूस्खलन आणि अचानक पूर यांची साखळी तयार झाली, तर काही तासांत संपूर्ण खोरे उद्ध्वस्त होऊ शकते. हिमालयात विकास थांबविण्याचा प्रश्न नाही. रस्ते, पूल, दळणवळण, आरोग्य सुविधा आणि ऊर्जा प्रकल्प आवश्यक आहेत. प्रश्न आहे तो हिमालयाच्या वहनक्षमतेचा विचार न करता केलेल्या विकासाचा.

डोंगर कापून रस्ते बांधणे, नदीकाठावर अनियंत्रित बांधकाम करणे, उतारांची नैसर्गिक रचना बदलणे, मोठ्या प्रमाणावर पर्यटन प्रकल्प उभारणे किंवा स्थानिक पर्यावरणाचा पुरेसा अभ्यास न करता पायाभूत प्रकल्प राबविणे यामुळे नैसर्गिक जोखीम वाढू शकते. डोंगर म्हणजे केवळ दगड-मातीचा ढिगारा नाही. त्याची स्वतःची भूगर्भीय रचना, जलव्यवस्था आणि परिसंस्था असते. त्या रचनेत मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप केला तर निसर्ग त्याची किंमत वसूल करतो. म्हणूनच प्रत्येक मोठ्या प्रकल्पापूर्वी केवळ आर्थिक व्यवहार्यता नव्हे, तर भूगर्भीय स्थैर्य, भूस्खलनाचा धोका, पाण्याचा नैसर्गिक प्रवाह आणि हवामानबदलाचा संभाव्य परिणाम यांचा सखोल अभ्यास झाला पाहिजे. हिमालयीन प्रदेशात जलविद्युत प्रकल्पांचे मोठे महत्त्व आहे. ऊर्जा, रोजगार आणि विकासासाठी त्यांची गरज असू शकते. मात्र हा प्रदेश भूकंपीय आणि भूस्खलनाच्या दृष्टीने संवेदनशील असल्याने अशा प्रकल्पांचे नियोजन अत्यंत सावधपणे करावे लागेल.

मोठ्या जलाशयांमुळे होणारे संभाव्य भूगर्भीय परिणाम, भूस्खलन, नदीच्या परिसंस्थेतील बदल आणि आपत्कालीन परिस्थितीत धरणाची सुरक्षितता यांचा स्वतंत्र वैज्ञानिक अभ्यास आवश्यक आहे. विशेषतः चीनच्या तिबेटमधील मोठ्या जलविद्युत प्रकल्पांबाबत भारत आणि इतर शेजारी देशांच्या चिंता आहेत. मात्र या विषयावर राजकीय दावे करण्यापेक्षा स्वतंत्र वैज्ञानिक माहिती, पारदर्शक डेटा आणि सीमापार संवाद यांना प्राधान्य दिले पाहिजे. निसर्गातील प्रत्येक आपत्ती रोखता येत नाही. मात्र तिच्यामुळे होणारे नुकसान मोठ्या प्रमाणात कमी करता येते. हिमनदीय तलावांचे उपग्रहाद्वारे सातत्याने निरीक्षण, भूस्खलनप्रवण भागांचे नकाशीकरण, नदीपातळी मोजण्यासाठी स्वयंचलित यंत्रणा, अतिवृष्टीचे स्थानिक अंदाज आणि गावपातळीवर तातडीच्या सूचना देणारी यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. आपत्तीची सूचना प्रशासनापर्यंत पोहोचून उपयोग नाही; ती धोक्यात असलेल्या गावातील सामान्य नागरिकापर्यंत त्याच्या मोबाईलवर, सायरनद्वारे किंवा स्थानिक यंत्रणेमार्फत वेळेत पोहोचली पाहिजे.

पूर्वसूचना मिळाल्यानंतर सुरक्षित स्थलांतरासाठी मार्ग, निवारा केंद्रे आणि स्थानिक आपत्कालीन पथकेही तयार असली पाहिजेत. हिमालयीन संकटांचे स्वरूप पाहता भारत, नेपाळ, भूतान, बांगलादेश आणि आवश्यक त्या स्तरावर चीन यांच्यात अधिक व्यापक सहकार्याची गरज आहे.

# जेन झी पुढे सोरेन सरकार नमले

**नवी दिल्ली** येथे जंतरमंतरवर जेन झीने केलेल्या आंदोलनानंतर धर्मेंद्र प्रधान यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. नीट परीक्षा व्यवस्था सुधारणेसाठी ठोस पावले उचलावी लागली. पेपर फुटीप्रकरणी नीटमधील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांची गच्छंती झाली. झारखंडमधे रांची येथे विद्यार्थ्यांनी राज्याच्या स्पर्धात्मक परीक्षांमधे झालेले घोटाळे, गैरव्यवहार व भ्रष्टाचाराच्या विरोधात लढा दिला. रांचीच्या जयपालसिंह मुंडा स्टेडियममधे तब्बल २६ दिवस विद्यार्थ्यांनी ठिय्या देऊन सरकारला नमवले. गेल्या दहा वर्षात झालेल्या २२ परीक्षा व परीक्षा उत्तीर्ण होऊन झालेली सरकारी नोकर भरती यांतील घोटाळ्याची चौकशी करण्याचा निर्णय मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी जाहीर केल्यानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले. तब्बल १६ दिवस चालवलेले उपोषण विद्यार्थ्यांनी सोडले. मात्र यापुर्वी परीक्षा उत्तीर्ण होऊन सरकारी नोकरीत भरती झालेल्या सुमारे दोन हजार तरूणांचे भविष्य टांगणीला लागले आहे. आंदोलन कुणाचे व शिक्षा कुणाला अशी त्यांची अवस्था झाली आहे.

जेन झीच्या आक्रमक आंदोलनानंतर दहा वर्षात झालेल्या २२ परीक्षा रद्द करण्याचा धाडसी निर्णय घेणे हे सरकारला सोपे नव्हते. परीक्षा घोटाळ्यांची चौकशी सीबीआयकडे सोपवावी, या मागणीचा जोर वाढू लागल्याने जेन झी समोर झुकण्यावाचून सोरेन सरकारला पर्यायच राहीला नाही. सीबीआय कडे चौकशी सोपवणे हे सोरेन सरकारला मान्य नव्हते. केंद्रीय चौकशी यंत्रणाचा बडगा काय असतो हे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी स्वत: अनुभवले आहे. म्हणूनच सीबीआय चौकशी सोडून विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य करण्याची त्यांनी तयारी दर्शवली.

झारखंडमधे झारखंड मुक्ति मोर्चा, राजद व कॉंग्रेस असे आघाडी सरकार आहे. जेनझीच्या आंदोलनामुळे सोरेन सरकार अडचणीत सापडले म्हणून भाजपा खूश होती. विद्यार्थी मोर्चात भाजपाचे कार्यकर्ते पक्षाचे झेंडे फडकावत सामील झाले होते तर अभाविपचे कार्यकर्ते सीबीआय चौकशीची मागणी सतत रेटत राहीले. सन २०१४ पासून सरकारी नोकर भरतीसाठी ज्या स्पर्धात्मक परीक्षा राज्यात झाल्या, त्या सर्व रद्द करण्याची पाळी सोरेन सरकारवर आली. सोरेन सरकारने घेतलेला निर्णय कठोर आहे, पण २२ परीक्षांतील घोटाळ्याची चौकशी करण्याची तयारी सरकारने दर्शविल्यानंतरच जेनझी चे ठिय्या आंदोलन मागे घेतले. सोरेन सरकार जेन झीपुढे झुकले. पण सरकारमधील कोणाही मंत्र्याला राजीनामा देण्याची पाळी आली नाही. सीबीआयकडे चौकशी सोपविली गेली नाही. परीक्षा व भरती घोटाळ्याची चौकशी सीबीआयकडे सोपवली असती तर केंद्र सरकारला सोरेन सरकार बदनाम करण्याची आयती संधी चालून आली असती. शिवाय चौकशीच्या नावाखाली सीबीआयचे पथक राज्यातील अधिकारी तसेच सत्ताधारी आघाडीतील नेत्यांच्या घरात घुसले असते. सरकारची अब्रू चव्हाट्यावर टांगली गेली असती. सोरेन सरकारने २२ परीक्षा रद्द करून व झालेली भरती स्थगित करून स्वत:ला वाचविण्यात तूर्त तरी यश मिळवले आहे. झारखंड लोकसेवा आयोग व झारखंड स्टाफ सिलेक्शन आयोग यांनी घेतलेल्या स्पर्धात्मक परीक्षातील घोटाळ्यांची चौकशी होणार आहे. परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटणे, डिजिटल नोंदणीत घोटाळा, पैशाची देवघेव व भ्रष्टाचार अशा आरोपांनी झारखंडमधील परीक्षा व्यवस्थेला घेरले आहे. झारखंड लोकसेवा आयोगाच्या तीन सदस्यांनी यापुर्वीच राजीनामा दिले आहेत. परीक्षा व्यवस्थेत सुधारणा आणि पारदर्शकता आणण्यासाठी वरिष्ठ आयएएस अधिकारीअमिताभ कौशल यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने एक तज्ञांची समिती नेमली आहे. सरकारला झुकवणारे जेन झीचे आंदोलन अशी राज्याच्या इतिहासात नोंद होईल. यावर्षी झालेल्या स्पर्धात्मक परीक्षांमधे गैरव्यवहार झाल्याच्या बातम्या मिडियामधे जुलैमधे झळकल्या, तेव्हाच विद्यार्थी रस्त्यावर उतरून संताप प्रकट करू लागले. नंतर रांची मधील डॉ. जयपालसिंह मुंडा स्टेडियमवर विदयार्थ्यांनी ठिय्या मांडून आंदोलन सुरू केले. अगोदर बेमुदत धरणे व नंतर बेमुदत उपोषण सुरू झाले. बेमुदत उपोषणाने अनेक विद्यार्थ्यांची तब्येत बिघडली व त्यांना उपचारासाठी इस्पितळात हलवावे लागले. गेल्या दोन आठवड्यापासून विद्यार्थी नेता देवेंद्रनाथ महतो व राहुल क्रांती यांनी स्टेडियमधे बेमुदत उपोषण सुरू केले. त्यामुळे आंदोलनाची तीव्रता वाढली. सरकारने प्रारंभी सन २०२३ व २०२५ च्या परीक्षा रद्द करण्याची तयारी दर्शवली. पण पेपर फुटी व भरती घोटाळे सतत होत असल्याने विद्यार्थी संतप्त झाले. जोपर्यंत घोटाळ्यांची चौकशी व पारदर्शक परीक्षा घेण्याचे आश्वासन मिळत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा निर्धार जेन झीने केला होता. एवढेच नव्हे तर वीस ऑगस्टला मुख्यमंत्री निवासस्थानाला घेरावो करण्याचा इशारा दिला होता. विधानभवनावर विशाल मोर्चा नेण्याचेही जाहीर केले होते. जेन झीच्या निर्धारापुढे सोरेन सरकारला त्यांच्या सर्व मागण्या मंजुर कराव्या लागल्या. विद्यार्थी आंदोलन तीव्र झाल्यावर सोरेन यांच्या मंत्रिमंडळाने गुप्तचर खात्याच्या अहवालाचीही नोंद घेतली. जेन झी आंदोलन चिघळले तर त्याचा आगामी विधानसभा निवडणुकीवर विपरीत परिणाम होऊ शकतो अशी चिन्हे दिसू लागल्याने सोरेन सरकारला त्यांच्या मागण्या मान्य केल्याशिवाय पर्यायच उरला नाही. राज्याचे सीआयडी किंवा सरकारने नेमलेली एसआयटी परीक्षा व भरती घोटाळ्यात गुंतलेल्या बड्या धेंडांपर्यंत पोचू शकणार नाही, म्हणूनच विद्यार्थी सीबीआय चौकशीची मागणी करीत होते. पण सीबीआयकडे चौकशी सोपवणे म्हणजे सरकारचे कौउंट डाऊन सुरू झाले असते. म्हणूनच सीबीआय चौकशी वगळून जेन झीच्या सर्व मागण्या त्यांनी मंजुर केल्या व तूर्त तरी आंदोलनाच्या विळख्यातून स्वत:ची व सरकारची सुटका करून घेतली. स्वत: मुख्यमंत्री हेमंत सोरेन एका जमीन घोटाळा प्रकरणी इडीच्या चौकशीत अडकले होते, त्यांना महिनाभर जेलमधे राहावे लागले होते. त्यामुळे त्यांना सीबीआय चौकशी ओढवून घेणे नको होते.

परीक्षा रद्द करून त्यांची चौकशी सुरू झाल्यामुळे गेल्या दहा वर्षात स्पर्धा परीक्षातून सरकारी नोकरीत भरती झालेले दोन हजारजण रस्त्यावर आले आहेत. दिवाणी कोर्टात न्यायाधीश, कृषी अधिकारी, अध्यापक, अन्न सुरक्षा अधिकारी, सहाय्यक अभियंता अशा विविध पदांवर नेमणुका झालेल्यांना कार्यालयात येण्यापासून रोखले जात आहे. सरकारने आमच्याशी चर्चा न करता सेवा खंडीत करण्याचा निर्णय घेतला म्हणून ते आक्रोश करीत आहेत. फांसी दो, या न्याय दो, अशा घोषणा देत ते रस्त्यावर उभे दिसतात.

झारखंडमधे गेल्या बारा वर्षापासून स्पर्धात्मक परीक्षा संशयाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. पण इतक्या वर्षात सारे राजकीय पक्ष व त्यांच्या विद्यार्थी संघटना काय करीत होत्या ? राजकीय पक्ष व त्या पक्षांच्या विद्यार्थी संघटना यांच्यावर जेन झीचा विश्वास राहिलेला नाही. म्हणून सुशिक्षित तरूणांची फौज त्यांच्या मागण्यासाठी न घाबरता रस्त्यावर उतरू लागली आहे. जेन झीला कोणी नेता नाही, राजकीय नेत्याला ते आपल्या आंदोलनात शिकराव करू देत नाहीत. जेन झी पोलीस, प्रशासन किंवा सत्ताधारी नेत्यांच्या धमक्यांना घाबरत नाही. जेन झीची ताकद काय असते हे पंतप्रधान नरेंद्र मोदींना कळले आहे. म्हणून ते आता संवाद साधण्यासाठी इंस्टाग्रामचा वापर करीत आहे. मंत्र्यांनी विद्यापीठ व शिक्षण संस्थाना भेटी द्याव्यात असे त्यांनी सहकाऱ्यांना सांगितले आहे.

**– डॉ. सुकृत खांडेकर**

# भटक्या-विमुक्तांच्या मुक्तीपासून सन्मानाच्या वाटचालीपर्यंत

**३१ ऑगस्ट** हा दिवस भटके-विमुक्त समाजाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा आणि भावनिक दिवस आहे. हा केवळ एखादा स्मृतिदिन नाही, तर अन्याय, कलंक, उपेक्षा आणि सामाजिक बहिष्काराच्या दीर्घ इतिहासातून स्वाभिमान, समानता आणि मानवी प्रतिष्ठेकडे वाटचाल करण्याचे प्रतीक आहे. महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस 'भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करण्यास २०२५ मध्ये अधिकृत मान्यता दिली. त्यामुळे हा दिवस साजरा करताना केवळ औपचारिक कार्यक्रम न करता भटके-विमुक्त समाजाच्या ऐतिहासिक वेदना, वर्तमानातील प्रश्न आणि भविष्यातील संधी यांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

भारतीय समाजरचनेत भटक्या आणि विमुक्त जमातींचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. उपजीविकेच्या पारंपरिक साधनांनुसार, जीवनपद्धतीनुसार आणि भौगोलिक परिस्थितीनुसार अनेक समूहांनी भटकंतीचे जीवन स्वीकारले. काही समूह पारंपरिक कला, लोककला, पशुपालन, हस्तकला, मनोरंजनाचे विविध प्रकार, औषधी वनस्पतींचे ज्ञान, लघु व्यापार, लोहारकाम, दगडकाम, बांधकामाशी संबंधित कौशल्ये किंवा इतर पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून होते. स्थिर गावव्यवस्थेच्या चौकटीबाहेर राहणाऱ्या या समूहांनी आपल्या ज्ञानाच्या आणि कौशल्याच्या बळावर समाजजीवनात महत्त्वाचे योगदान दिले. मात्र स्थिर वस्ती, जमीन आणि पारंपरिक सामाजिक संस्थांच्या अभावामुळे त्यांना सामाजिक सुरक्षेपासून आणि संस्थात्मक संधींपासून मोठ्या प्रमाणावर वंचित राहावे लागले.

भटके आणि विमुक्त या संज्ञांमध्ये सूक्ष्म फरक आहे. भटक्या जमातींच्या जीवनपद्धतीत स्थलांतर आणि भटकंतीला विशेष महत्त्व असते; तर 'विमुक्त' ही संज्ञा ब्रिटिश राजवटीत 'गुन्हेगार जमाती' म्हणून कलंकित करण्यात आलेल्या आणि नंतर त्या कायदेशीर कलंकातून मुक्त झालेल्या समुदायांसाठी वापरली जाते. महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्त समाजात अनेक विविध जाती-जमातींचा समावेश होतो. या विविध समूहांची सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थिती एकसारखी नसली तरी ऐतिहासिक उपेक्षा आणि सामाजिक कलंकाचा अनुभव अनेक समूहांना समानपणे सहन करावा लागला आहे. या समाजाच्या इतिहासातील सर्वांत काळा अध्याय म्हणजे ब्रिटिशांनी लागू केलेला 'क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्ट' होय. १८७१ मध्ये करण्यात आलेल्या या कायद्यामुळे काही संपूर्ण जाती-जमातींना त्यांच्या वैयक्तिक कृतीवर नव्हे, तर केवळ जातीय ओळखीच्या आधारे 'गुन्हेगार' म्हणून नोंदविण्याची अमानुष व्यवस्था निर्माण झाली. म्हणजेच एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला किंवा नाही, यापेक्षा ती व्यक्ती कोणत्या समुदायात जन्माला आली आहे, याला अधिक महत्त्व देण्यात आले. हा आधुनिक न्यायव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांनाच छेद देणारा प्रकार होता.

या कायद्यामुळे संपूर्ण समुदायांवर संशयाची छाया पडली. त्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात आले, नोंदणी आणि देखरेखीच्या विविध यंत्रणा उभ्या करण्यात आल्या आणि अनेकांना तथाकथित 'सेटलमेंट'मध्ये ठेवण्यात आले. त्यांच्या स्वातंत्र्यावर आणि उपजीविकेच्या पारंपरिक मार्गांवर निर्बंध आले. परिणामी सामाजिक कलंक, आर्थिक दारिद्र्य आणि प्रशासकीय नियंत्रण यांचे दुष्टचक्र निर्माण झाले. सर्वांत वेदनादायक बाब म्हणजे 'गुन्हेगार' हा शिक्का व्यक्तीच्या कृतीशी जोडलेला नसून जन्माशी जोडला गेला. अशा प्रकारची जन्मजात गुन्हेगारीची कल्पना मानवी प्रतिष्ठेला नाकारणारी होती. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या व्यापक इतिहासातही या समुदायांचे योगदान अनेकदा पुरेसे अधोरेखित झालेले दिसत नाही. ब्रिटिश सत्तेविरुद्ध विविध स्वरूपात प्रतिकार करणाऱ्या अनेक स्थानिक समुदायांवर ब्रिटिश प्रशासनाने कठोर नियंत्रण ठेवले. भटक्या-विमुक्त समाजातील विविध समूहांच्या इतिहासात स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि अस्तित्वासाठी संघर्षाची अनेक उदाहरणे आहेत. म्हणूनच या समाजाचा इतिहास केवळ दारिद्र्याचा किंवा मागासलेपणाचा इतिहास म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. तो प्रतिकाराचा, जिद्दीचा, सांस्कृतिक सातत्याचा आणि अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या संघर्षाचा इतिहास आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकशाहीसमोर या ऐतिहासिक अन्यायाचे निराकरण करण्याचे आव्हान होते. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी ब्रिटिशकालीन 'क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्ट-१८७१' रद्द करण्यात आला आणि त्या कायद्याच्या कक्षेत असलेल्या समुदायांना 'विमुक्त' म्हणून ओळख मिळाली. त्यामुळे ३१ ऑगस्ट हा दिवस या समाजाच्या दृष्टीने एका ऐतिहासिक बंधनातून मुक्ततेचे प्रतीक ठरला.

मात्र कायदा रद्द झाला म्हणून सामाजिक कलंक तात्काळ संपला नाही. कायद्याच्या पुस्तकातील 'गुन्हेगार' हा शब्द काढून टाकणे सोपे होते; पण समाजाच्या मानसिकतेतील संशय आणि पूर्वग्रह दूर करणे अधिक कठीण होते. अनेक दशकांनंतरही भटक्या-विमुक्त समाजातील काही घटकांना पोलिसी संशय, सामाजिक अविश्वास आणि भेदभावाचा सामना करावा लागल्याचे सामाजिक अभ्यासांतून आणि विविध अनुभवांतून दिसून येते. एका अन्यायकारक कायद्याने निर्माण केलेली मानसिकता पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचते, याची ही जाणीव करून देणारी बाब आहे.

भटक्या-विमुक्त समाजाच्या वर्तमान प्रश्नांकडे पाहिले तर शिक्षण हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. स्थिर निवासाचा अभाव, वारंवार स्थलांतर, आर्थिक अस्थिरता, शाळेपासून भौगोलिक अंतर आणि कागदपत्रांची कमतरता यामुळे अनेक मुलांना सातत्याने शिक्षण घेणे कठीण जाते. एखादे मूल शाळेत दाखल झाले तरी कुटुंबाच्या स्थलांतरामुळे त्याचे शिक्षण खंडित होऊ शकते. त्यामुळे केवळ शाळेत प्रवेश देणे पुरेसे नाही; शिक्षणाची सातत्यपूर्णता, वसतिगृहांची उपलब्धता, शिष्यवृत्ती, शैक्षणिक मार्गदर्शन आणि कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्याशी जोडलेली उपाययोजना आवश्यक आहे.

शिक्षणाबरोबरच निवासाचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. स्थिर घर हे केवळ निवाऱ्याचे साधन नसून शिक्षण, आरोग्य, मतदानाचा हक्क, सरकारी योजना, बँकिंग, रोजगार आणि सामाजिक सुरक्षितता यांच्याशी जोडलेले असते. ज्यांच्याकडे स्थिर पत्ता नाही, त्यांच्यासाठी अनेक शासकीय प्रक्रियाच कठीण होतात. जन्मनोंदणी, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, आधारसारखी ओळखपत्रे, शिधापत्रिका आणि इतर कागदपत्रे मिळविण्याच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींमुळे योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे 'कागदपत्रे' हा केवळ प्रशासकीय विषय नसून सामाजिक समावेशनाचा मूलभूत प्रश्न आहे. रोजगाराच्या बाबतीतही भटक्या-विमुक्त समाजासमोर मोठी आव्हाने आहेत. पारंपरिक व्यवसायांमध्ये आधुनिक बाजारपेठेतील बदलांमुळे उत्पन्नाच्या संधी कमी झाल्या आहेत. अनेक पारंपरिक कला आणि कौशल्ये आधुनिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली नाहीत तर ती पुढील पिढ्यांपर्यंत टिकणे कठीण होईल. त्यामुळे पारंपरिक कौशल्यांचे जतन करताना त्यांचे आधुनिक कौशल्यविकास, बाजारपेठ, डिजिटल माध्यमे, सहकारी संस्था आणि उद्योजकतेशी नाते जोडणे आवश्यक आहे. समाजातील युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षण, रोजगाराभिमुख शिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या तर आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अधिक व्यापक होऊ शकतो. महिलांच्या प्रश्नांकडेही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. भटक्या-विमुक्त समाजातील महिलांना गरिबी, अस्थिर उपजीविका, शिक्षणाचा अभाव, आरोग्यविषयक अडचणी आणि सामाजिक असुरक्षितता अशा अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागू शकते. महिलांच्या शिक्षणाला प्राधान्य, स्वयं-सहायता गटांची निर्मिती, कौशल्यविकास, आर्थिक साक्षरता, सुरक्षित निवास आणि आरोग्यसेवा यांना विकासाच्या केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. एखाद्या समाजाचा खरा विकास मोजायचा असेल तर त्या समाजातील महिलांची स्थिती आणि मुलींच्या शिक्षणाच्या संधी यांचा विचार करणे अपरिहार्य आहे. भटके-विमुक्त समाजाच्या सांस्कृतिक संपदेचाही गांभीर्याने विचार झाला पाहिजे. लोककला, लोकपरंपरा, मौखिक इतिहास, लोकसंगीत, कथाकथन, हस्तकला, पारंपरिक ज्ञान आणि जीवनपद्धती ही भारतीय सांस्कृतिक विविधतेची महत्त्वपूर्ण अंग आहेत. आधुनिकतेच्या प्रवाहात या परंपरा नष्ट होऊ नयेत, यासाठी त्यांचे दस्तऐवजीकरण आणि संवर्धन आवश्यक आहे. मात्र संस्कृतीचे संवर्धन करताना त्या समाजाला केवळ 'लोककलेचे प्रदर्शन' म्हणून पाहणे टाळले पाहिजे. त्यांच्या संस्कृतीचा आदर करण्याबरोबरच त्यांच्या शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवास आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांनाही समान महत्त्व दिले पाहिजे.

आज संविधानिक मूल्ये भटके-विमुक्त समाजाच्या प्रश्नांकडे पाहण्यासाठी आपल्याला महत्त्वाची दिशा देतात. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी दिली आहे. त्यामुळे जन्म, जात, जीवनपद्धती किंवा सामाजिक पार्श्वभूमीच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीकडे संशयाने पाहणे संविधानाच्या समतेच्या भावनेला विरोध करणारे आहे. भटके-विमुक्त समाजाचा प्रश्न हा केवळ एखाद्या विशिष्ट समाजघटकाचा प्रश्न नसून भारतीय लोकशाहीच्या समावेशकतेची कसोटी आहे. महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस अधिकृतपणे 'भटके विमुक्त दिवस' म्हणून मान्य केल्यामुळे या प्रश्नांना नव्याने सामाजिक आणि प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु कोणताही स्मृतिदिन तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो, जेव्हा त्या निमित्ताने वास्तवातील प्रश्नांवर ठोस कृती होते. कार्यक्रम, भाषणे आणि गौरव सोहळे आवश्यक असले तरी त्यापलीकडे जाऊन शिक्षण, निवास, रोजगार, आरोग्य, कागदपत्रे आणि सामाजिक सुरक्षा या प्रश्नांवर परिणामकारक उपाययोजना होणे अधिक महत्त्वाचे आहे. भटके-विमुक्त समाजाच्या विकासासाठी शासन, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि समाजातील संवेदनशील घटक यांनी परस्पर सहकार्याने काम करण्याची गरज आहे. विद्यापीठे आणि संशोधन संस्थांनी या समाजाच्या इतिहासाचा, संस्कृतीचा, शिक्षणाचा, अर्थकारणाचा आणि सामाजिक बदलाचा शास्त्रीय अभ्यास वाढवला पाहिजे. त्यांच्या विषयी संशोधन करताना मात्र त्यांच्याकडे केवळ 'अभ्यासाचा विषय' म्हणून न पाहता त्यांच्या अनुभवांना आणि ज्ञानाला महत्त्व देणे आवश्यक आहे. विशेषतः नव्या पिढीच्या युवकांना या समाजाच्या प्रश्नांशी जोडणे महत्त्वाचे आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण, कौशल्यविकास, उद्योजकता आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळाल्यास भटक्या-विमुक्त समाजातील युवक केवळ रोजगार शोधणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनू शकतात. पारंपरिक कौशल्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास सांस्कृतिक वारसा आणि आर्थिक विकास यांची सांगड घालता येऊ शकते. ३१ ऑगस्टचा भटके-विमुक्त दिन आपल्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारतो की कायदा बदलला, पण समाजाची मानसिकता कितपत बदलली? १९५२ मध्ये कायदेशीर मुक्ती मिळाली; परंतु खरी सामाजिक मुक्ती तेव्हाच पूर्ण होईल, जेव्हा कोणत्याही मुलाला त्याच्या जन्माच्या आधारावर कमी लेखले जाणार नाही, कोणत्याही कुटुंबाला केवळ त्याच्या भटक्या जीवनपद्धतीमुळे संशयाच्या नजरेने पाहिले जाणार नाही आणि कोणत्याही व्यक्तीला सामाजिक प्रतिष्ठेसाठी आपल्या पार्श्वभूमीचा पुरावा देत राहण्याची गरज भासणार नाही. कायद्याने दिलेली समानता समाजमानसात उतरली, तरच स्वातंत्र्याचा अर्थ खऱ्या अर्थाने व्यापक होईल.

आज भटके-विमुक्त समाजाकडे दयेच्या नजरेने पाहण्याची नव्हे, तर समानतेच्या आणि सन्मानाच्या नजरेने पाहण्याची गरज आहे. त्यांच्या प्रश्नांकडे केवळ कल्याणकारी योजनांच्या चौकटीतून न पाहता सामाजिक न्यायाच्या व्यापक चौकटीतून पाहिले पाहिजे. 'त्यांच्यासाठी काय करता येईल?' या प्रश्नाबरोबरच 'त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी कसे करून घेता येईल?' हा प्रश्नही विचारला पाहिजे. त्यांच्या नेतृत्वाला, अनुभवांना आणि ज्ञानाला विकासाच्या प्रक्रियेत स्थान मिळाले पाहिजे.

३१ ऑगस्ट हा दिवस म्हणून साजरा करताना १९५२ च्या मुक्तीची आठवण ठेवणे आवश्यक आहे; परंतु त्याचबरोबर आजच्या पिढीसमोर उभ्या असलेल्या अदृश्य बंधनांचीही जाणीव ठेवली पाहिजे. शिक्षणाचा अभाव, भूमिहीनता, अस्थिर निवास, बेरोजगारी, कागदपत्रांचा प्रश्न, आरोग्याच्या सुविधा, सामाजिक पूर्वग्रह आणि आर्थिक असुरक्षितता ही आजची आव्हाने आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी सातत्यपूर्ण आणि संवेदनशील धोरणांची आवश्यकता आहे.

खऱ्या अर्थाने भटके-विमुक्त दिन साजरा करायचा असेल तर त्या दिवशी केवळ इतिहासाचे स्मरण न करता भविष्याचा संकल्प करावा लागेल. प्रत्येक भटक्या-विमुक्त मुलाला दर्जेदार शिक्षण, प्रत्येक कुटुंबाला सन्मानजनक निवास, प्रत्येक युवकाला कौशल्य व रोजगाराची संधी, प्रत्येक महिलेला सुरक्षितता आणि आर्थिक स्वावलंबन, प्रत्येक नागरिकाला आवश्यक कागदपत्रे आणि प्रत्येक व्यक्तीला संविधानाने दिलेली समान प्रतिष्ठा मिळवून देण्याचा संकल्प करावा लागेल. हीच त्या ऐतिहासिक मुक्तीची खरी फलश्रुती ठरेल.

भटक्या-विमुक्त समाजाची कहाणी ही केवळ एका समाजाची कहाणी नाही; ती भारतीय लोकशाहीच्या सामाजिक न्यायाच्या प्रवासाची कहाणी आहे. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी एका अन्यायकारक कायद्याची समाप्ती झाली; आता ३१ ऑगस्ट हा दिवस सामाजिक पूर्वग्रह, भेदभाव आणि वंचिततेच्या अदृश्य भिंती मोडण्याच्या नव्या संकल्पाचा दिवस झाला पाहिजे. कायद्याने दिलेली मुक्ती सामाजिक सन्मानात आणि आर्थिक स्वावलंबनात रूपांतरित झाली, तरच 'विमुक्त' ही संज्ञा केवळ इतिहासाची आठवण न राहता वर्तमानाची जिवंत वास्तवता बनेल. म्हणूनच भटके-विमुक्त दिनाचा संदेश स्पष्ट आहे की मुक्ती केवळ बंधनांतून बाहेर पडण्यात नाही; तर समान संधी, सन्मान, स्वाभिमान आणि न्यायासह समाजाच्या मुख्य प्रवाहात प्रतिष्ठेने उभे राहण्यात आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

# मलिक अंबर यांच्या ४००व्या पुण्यतिथीनिमित्त ‘महमूदपुरा हेरिटेज वॉक’; ऐतिहासिक जलव्यवस्था आणि दुर्लक्षित वारशाची नागरिकांना ओळख





छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) – निजामशाहीतील दूरदर्शी मंत्री, कुशल प्रशासक आणि तत्कालीन खडकी शहराच्या विकासात मोलाचे योगदान देणारे मलिक अंबर यांच्या ४००व्या पुण्यतिथीनिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या पर्यटन विभाग व खछढअउक छत्रपती संभाजीनगर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमानाने ‘महम ूदपुरा हेरिटेज वॉक’चे आयोजन रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले. शहराची ऐतिहासिक जलव्यवस्था, नगररचना, स्थापत्य वारसा आणि महम ूदपुरा परिसराच्या इतिहासाची नागरिकांना ओळख करून देणे हा या उपक्रमाचा प्रम ुख उद्देश होता.

हेरिटेज वॉकची सुरुवात नहर-ए-अंबरीच्या प्रमुख ऐतिहासिक स्थळांपैकी एक असलेल्या गोमुख येथून झाली. मलिक अंबर यांनी तत्कालीन खडकी शहराच्या नियोजनबद्ध विकासाला चालना देत नहर-ए-अंबरीच्या माध्यमातून शहरासाठी प्रभावी जलपुरवठा व्यवस्था निर्माण केली होती. सुमारे चार शतकांपूर्वी विकसित झालेल्या या जलव्यवस्थेचे ऐतिहासिक महत्त्व आणि तिच्यामागील अभियांत्रिकी कौशल्य याविषयी सहभागी नागरिकांना माहिती देण्यात आली.

खछढअउक छत्रपती संभाजीनगर चॅप्टरचे सह-संयोजक ॲड. स्वप्निल जोशी यांनी प्रास्ताविक केले. मलिक अंबर यांच्या ४००व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने आयोजित या हेरिटेज वॉकची संकल्पना व उद्देश त्यांनी स्पष्ट केला. शहरातील प्रसिद्ध स्मारकांबरोबरच विविध वस्त्यांमध्ये विखुरलेल्या तुलनेने अपरिचित ऐतिहासिक वास्तू, पारंपरिक जलव्यवस्था आणि सांस्कृतिक वारसा यांचे दस्तऐवजीकरण, संवर्धन आणि त्याबाबत जनजागृती होण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

इतिहास अभ्यासक संकेत कुलकर्णी आणि आदित्य वाघमारे यांनी वॉकचे मार्गदर्शन केले. त्यांनी नहर-ए-अंबरीची ऐतिहासिक जलव्यवस्था, महमूदपुरा परिसराचा इतिहास, येथील विविध वास्तूंचे ऐतिहासिक व स्थापत्यशास्त्रीय महत्त्व तसेच मलिक अंबर यांच्या नगरविकासातील योगदानाची माहिती सहभागी नागरिकांना दिली.

वॉकदरम्यान नागरिकांनी महमूदपुरा येथील ऐतिहासिक मकबरा तसेच श्री नीलकंठेश्वर महादेव मंदिर यांना भेट दिली. राजपूत छत्री स्थापत्यशैलीत बांधलेली बारादरी हे या परिसरातील एक वैशिष्ट्यपूर्ण स्थापत्य असून, तिच्या वास्तुशिल्पीय वैशिष्ट्यांची माहितीही यावेळी देण्यात आली. या हेरिटेज वॉकला शहराचे महापौर श्री. समीर राजूरकर, सभापती श्री. अनिल मकरिये, विरोधी पक्षनेते श्री. अब्दुल समीर साजिद, नगरसेवक श्री. राजगौरव वानखेडे, महानगरपालिका आयुक्त श्री. अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त श्री. रणजित पाटील, महानगरपालिकेच्या पर्यटन विभागाचे उप आयुक्त श्री. अंकुश पांढरे आणि सहाय्यक आयुक्त ऋतुजा पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने इतिहासप्रेमी, विद्यार्थी आणि नागरिक सहभागी झाले. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या पर्यटन विभाग व INTACH छत्रपती संभाजीनगर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यम ानाने आयोजित या उपक्रमातून शहराच्या सर्वपरिचित स्मारकां पलीकडे असलेल्या महमूदपुरा परिसरातील ऐतिहासिक व स्थापत्य वारशाकडे नागरिकांचे लक्ष वेधण्यात आले. मलिक अंबर यांच्या जलव्यवस्थापन आणि नगरनियोजनाच्या दूरदृष्टीपासून ते परिसरातील विविध स्थापत्य परंपरांपर्यंत शहराच्या बहुपेडी वारशाची ओळख सहभागी नागरिकांना झाली.

शहराच्या ऐतिहासिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी नागरिक, स्थानिक प्रशासन आणि वारसा संवर्धन क्षेत्रात कार्यरत संस्थांमधील अशा प्रकारचे सहकार्य महत्त्वपूर्ण असल्याचा संदेश या हेरिटेज वॉकमधून देण्यात आला.

# ती आली, तिने गायले आणि तिने जिंकले..... श्रेया घोषाल ‘ आशा भोसले ‘ पुरस्काराने सन्मानित



पुणे दि. ३१ (विजय न्यायाधीश यांजकडून ) – मंगेशकर घराण्यातील दिग्गजांकडून मला खुप शिकायला मिळाले. गाण्यातील भावभावना कशा पध्दतीने प्रकट करायच्या हे मी आशाताईकडे पाहून शिकले. त्यांच्या पासूनच मला गायनाची प्रेरणा मिळाली. आणि आज मला त्यांच्याच नावाने पुरस्कार मिळत आहे हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे असे भावपूर्ण उद्गार श्रेया घोषाल यांनी व्यक्त केले. अ. भा. मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा, पिंपरी चिंचवड कलारंग प्रतिष्ठान आणि सिद्धिविनायक ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी ख्यातनाम गायिका श्रेया घोषाल यांना ‘ आशा भोसले ‘ या पुरस्काराने पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. या सन्मान सोहळ्यात श्रेयाने काही गाजलेली मराठी – हिंदी सादर करुन तमाम पिंपरी चिंचवडकरांसाठी ‘ ती आली तिने गायले आणि तिने जिंकले ‘ या विधानाची प्रचिती दिली. संयमित प्रणयभाव व्यक्त करणारे ‘ तरुण आहे रात्र अजूनी राजसा निजलास का रे ‘, अतिशय आर्तपूर्ण ‘ जीवलगा राहिले रे दूर घर माझे ‘ तसेच बंगाली आणि हिंदी भाषेतील ‘ जाने क्या बात है जाने क्या बात है , निंद नहीं आती बडी लंबी रात है ‘ या काही गीतांच्या सादरीकरणातून श्रेयाने आशा भोसले यांची आठवण करुन देत उपस्थित रसिकांची मने जिंकली.

रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात झालेल्या या कार्यक्रमास आ. अमित गोरखे, मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, बांधकाम व्यावसायिक कृष्णकुमार गोयल, राष्ट्रवादी काँग्रेसचे योगेश बहल, कार्यक्रमाचे आयोजक आणि मनपा विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, मानसी भोईर – घुले, रुणाल साकला, वंदना गांगुर्डे, नेहा साकला , अ. भा. मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवडचे उपाध्यक्ष किरण येवलेकर आणि पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी आपल्या मनोगतात श्रेया घोषाल हिचे कौतुक करुन आशिर्वाद दिले. मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी श्रेया घोषाल यांना आशा भोसले पुरस्कार प्रदान करणे हे पिंपरी चिंचवड शहराचे भाग्य असल्याचे प्रतिपादन केले. सदरील पुरस्कार सोहळ्याच्या अनुषंगाने ‘ आशा से श्रेया तक ‘ हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

# गणेशोत्सव ‘डीजे’मुक्त आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करा ! – हिंदु जनजागृती समितीचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) – सार्वजनिक गणेशोत्सवाचे पावित्र्य राखण्यासाठी हा उत्सव पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि ‘डीजे’मुक्त साजरा करावा, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी केले आहे.

याविषयी आपली भूमिका स्पष्ट करताना श्री. सुनील घनवट पुढे म्हणाले की, ‘गणेशोत्सव हा मूळचा सात्विक, पवित्र आणि आनंददायी असा उत्सव आहे. परंतु, गेल्या काही वर्षांपासून या मंगलमय उत्सवाला गालबोट लागल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः ’डीजे’च्या माध्यमातून लावली जाणारी अश्लील गाणी, त्यावर होणारी बीभत्स नृत्ये आणि कर्णकर्कश आवाज यांसारख्या विकृती उत्सवात शिरल्या आहेत. या सर्व प्रकारांमुळे गणेशभक्त आणि सामान्य नागरिकांच्या आरोग्याचा व शांततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. लोकमान्य टिळकांनी समाज प्रबोधन, लोकजागृती आणि हिंदु संघटन या उदात्त हेतूंनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली होती. मात्र, सध्या पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणामुळे हा मूळ उद्देश कुठेतरी हरवत चालला असून उत्सवाचे स्वरूप विकृत होत आहे.

हिंदु जनजागृती समितीने गेल्या अनेक वर्षांपासून गणेशोत्सवातील या ’डीजे’ संस्कृतीला आणि अन्य अनिष्ट प्रथांना सातत्याने कडाडून विरोध दर्शवला आहे. यावर्षीही अशा अपप्रवृत्तींना आळा बसावा, अशी आमची ठाम मागणी आहे.

सद्यस्थितीत एक सकारात्मक बाब म्हणजे, अनेक गणेशोत्सव मंडळे ’डीजे’मुक्त उत्सव साजरा करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने पुढे येत आहेत. सोलापूरसारख्या शहरात ’सोलापूर पॅटर्न’ राबवून एक चांगला आदर्श निर्माण करण्यात आला आहे. भाविकांना खऱ्या अर्थाने सात्विक आनंद मिळवून देण्यासाठी, लोकप्रबोधन करण्यासाठी तसेच हिंदु संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्यासाठी उत्सवामध्ये ’डीजे’ची अजिबात आवश्यकता नाही. पारंपारिक वाद्यांच्या गजरात आणि आपल्या वैभवशाली संस्कृतीनुसार गणेशोत्सव साजरा केल्यास त्याला कोणाचाही विरोध असणार नाही.‘

त्यामुळे सर्व गणेशोत्सव मंडळे, गणेशभक्त आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे पुढे यावे आणि आपला गणेशोत्सव पारंपरिक वाद्यांच्या साथीने, अत्यंत आनंदाने व परंपरेनुसार ’डीजे’मुक्त साजरा करावा, असे आवाहन श्री. घनवट यांनी या वेळी केले.

# वीजचोरीप्रकरणी तिघांवर गुन्हा

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) – मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी केल्याप्रकरणी शहरातील तीन ग्राहकांवर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.

महावितरणचे सहायक अभियंता ज्ञानोबा राठोड व त्यांच्या सहकाऱ्यांनी चिकलठाणा उपविभागात वीजचोरी करणाऱ्यांविरुद्ध शोध मोहीम राबवली. काही ग्राहकांनी मीटरमध्ये फेरफार केल्याचे आढळून आले. यात पटेलनगरमधील शेख जमीर छोटू याने २२ हजार ८४० रुपयांची, नारेगावच्या कौसर पार्क येथील यासीन उस्मान पटेल याने ६ हजार ५०० रुपयांची तर इंद्रा मार्केट, एन-२, मुकुंदवाडी येथील शेख युनुस शेख युसुफ याने १५ हजार ११० रुपयांची वीजचोरी केल्याचे निष्पन्न झाले. सहायक राठोड यांच्या फिर्यादीवरून तिन्ही आरोपींवर सिडको पोलिस ठाण्यात विद्युत कायद्याच्या कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# जेष्ठांनो जीवनशैली बदला अन् नैराश्यावर मात करा जेष्ठ नागरिक -धोंडीरामसिंह राजपूत



वैजापूर, दि. ३१ (प्रतिनिधी) – वृद्धापकाळात येणारी नैराश्यता एक मानसिक आरोग्य स्थिती आहे, आयुष्याच्या संध्याकाळी अनेक जेष्ठ नागरिकाना शारिरीक, मानसिक,भावनिक, वैचारिक दुर्बलता येऊन एकटेपणा व नैराश्य जाणवते या स्थितीतून बाहेर येण्यासाठी जेष्ठ नागरिकांनी आपली जीवन शैली बदलली तर अंतिम काळातील नैराश्यावर सहज मात करून आनंदी जीवन जगता येते असे वक्तव्य जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांनी रविवार(ता,३०)रोजी वैजीनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघ च्या जेष्ठ नागरिक सभेत काढले, त्यांनी वयाची पंचाहत्तरी पूर्ण केल्या बद्धल त्यांचा विशेष सत्कार या सभेत करण्यात आला.

त्या प्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, झेपेल तेव्हढे व्यायाम करावे, आवडीचे छंद जोपासावे, कोडे सोडवावे, उलटे पाढे मोजावे, मैत्री वाढवावी तसेच शारीरिक हालचाली करून निरोगी रहावे असेही ते पुढे म्हणाले .या प्रसंगी अध्यक्षस्थानी जेष्ठ नागरिक रवींद्र आप्पा साखरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठतम नागरिक गोलालदास आसर, काशिनाथशेठ गायकवाड, पी.जी. श्रीवास्तव, व श्री गणोरे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रम आरंभी भारतमाता प्रतिमा पूजन झाले ज्या जेष्ठ नागरीक सभासदांचे वाढ दिवस जुलै व ऑगस्ट महिन्यात होते त्यांचे गुलाब पुष्प व शाल देऊन जेष्ठांच्या हस्ते अभिष्टचिंतन करण्यात आले.जेष्ठ नागरिक व कोषाध्यक्ष सुरेश संत, सह सचिव संपतराव डोंगरे,संचालक बबनराव क्षीरसागर, बाबासाहेब गायकवाड, सुभाष शेठ बोहरा,भगवानसिंह राजपूत,जवाहर कोठारी यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. संपतराव डोंगरे यांनी आभार मानले, बबनराव क्षीरसागर, बाबासाहेब गायकवाड यांनी सक्रिय सहकार्य केले.

शहरातील जेष्ठ नागरिक पी.वाय. चव्हाण, सुदाम गोंधळे, नारायण लाडवाणी, कृष्णा कांबळे, सुभाष चाफेकर, विद्याधर सोनवणे, सुभाष पोंदे, कृष्णा वानखेडे, पंढरीनाथ शेलार व बहुसंख्य जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

# श्री.गणेशाच्या आगमनाच्या निमित्ताने शास्त्रशुद्ध नित्य पूजा व पर्यावरण पूरक श्री. गणेश विसर्जनासाठी निशुल्क कार्यशाळेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) – सोमवार दिनांक १४ सप्टेंबर ला श्री. गणेशाचे आगमन होत आहे. घराघरात आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात श्री.गणेशाची स्थापना उत्साहात केली जाते. या पार्श्वभूमीवर विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयाम चिखलठाणा भाग तसेच स्वामी समर्थ गणेश मंडळ प्रणित मार्तंड ढोल पथक एन ८ सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने श्री.गणेश स्थापना प्राणप्रतिष्ठा करताना काय काळजी घ्यावी,श्री. गणेशाची नित्य पूजा व आरती कशी करावी,शास्त्रशुद्ध व पर्यावरण पूरक श्री गणेश विसर्जन पद्धत तसेच मंत्रोच्चार आणि आरतीचे योग्य पद्धतीने मार्गदर्शन या संदर्भात कार्यशाळेचे आयोजन रविवार दिनांक ६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता प्लॉट नंबर २२ डी २ श्री. गणेशनगर सिडको एन ८ मधील श्री. गणपती मंदिरात करण्यात आले असून या कार्यशाळेत वेदमूर्ती, वे.शा. सं. श्री. अनिरुद्धजी देशमुख म ार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यशाळेत मोठ्या संख्येत भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन ज्ञानेश्वर जाधव-शिवाजी दहिवाळ -राजू शेठ छडीदार -सौ. तृप्ती हर्सूलकर -सौ मयुरी व्यवहारे सौ राजश्री भिते-सौ अनुराधा पुराणिक व मार्तंड ढोल पथक प्रमुख रोहित विश्वनाथ स्वामी यांनी केले आहे.

# आर्यनंदी कॉलनीत रक्षाबंधन उत्सव उत्साहात




छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) – आर्यनंदी कॉलनीत रक्षाबंधन उत्सव उत्साहात खरी राखी ही केवळ मनगटावर बांधली जाणारी नसून ती आत्मसंयम, सदाचार आणि परस्पर प्रेमाची आठवण करून देणारी असते.आचार्य श्री हेमसागरजी महाराज

छत्रपती संभाजीनगर : आर्यनंदी कॉलनी येथे आचार्य श्री हेमसागरजी महाराज यांच्या सानिध्यात रक्षाबंधन उत्सव धार्मिक वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

उत्सवाची सुरुवात सकाळी भगवान चंद्रप्रभूंच्या पंचामृत अभिषेकाने करण्यात आली. त्यानंतर भगवान श्रेयांसनाथ यांच्या निर्वाणकांडाचे वाचन करून भगवंतांना निर्वाण लाडू अर्पण करण्यात आला. निर्वाण लाडू अर्पण करण्याचे सौभाग्य कुमकुम देवी, संजयकुमार विजयकुमार पापडीवाल परिवारास लाभले.

यानंतर आचार्य श्री हेमसागरजी महाराज यांच्या पिच्छीला प्रथम राखी बांधण्याचे सौभाग्य दिनेशकुमार, नीता, केतन कुणाल सेठी परिवारास मिळाले.

यावेळी आचार्य श्री हेमसागरजी महाराज



यांनी रक्षाबंधनाच्या आध्यात्मिक महत्त्वावर प्रवचनातून मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, ङ्गखरी राखी ही केवळ मनगटावर बांधली जाणारी नसून ती आत्मसंयम, सदाचार आणि परस्पर प्रेमाची आठवण करून देणारी असते. बाह्य संकटांपासून संरक्षण मिळिवण्याबरोबरच आपल्या मनातील विकारांपासून आत्म्याचे रक्षण करणे हाच धर्माचा खरा संदेश आहे.ङ्ग त्यांनी अहिंसा, संयम आणि सदाचाराचा मार्ग अंगीकारण्याचे आवाहन केले.

उत्सवानिमित्त आर्यनंदी कॉलनीतील जैन समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक विधींमध्ये सहभाग घेतला.

# बाह्यस्रोत यंत्रचालकास मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) – महावितरणच्या बाह्यस्रोत यंत्रचालकास मारहाण करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. अभिषेक पोफळे हे गाढेजळगाव उपकेंद्रात बाह्यस्रोत यंत्रचालक म्हणून दीड महिन्यांपासून काम करतात. २८ ऑगस्ट रोजी दुपारी २.४० वाजता बळीराम एकनाथ कोरडे (रा. गाढेजळगाव) उपकेंद्रात आला. माझ्या पत्नीला शेतात शॉक लागलेला आहे तुम्ही लाईट बंद करा असे त्याने सांगितले.

सहायक अभियंता सोनवणे यांना माहिती देऊन त्यांच्या आदेशाने पोफळे यांनी गाढेजळगाव ए.जी. फीडर बंद केले.

संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास फीडर चालू करून वीजपुरवठा पूर्ववत केला. सायंकाळी ६.१५ वाजता बळीराम एकनाथ कोरडे व अर्जुन अंबादास गाढेकर हे उपकेंद्रात आले. तू परत लाईट का चालू केली असे म्हणत त्यांनी पोफळेंना शिवीगाळ केली तसेच तू आताच लाईट बंद कर म्हणत मारहाण केली. या प्रकरणी पोफळेंच्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपींवर करमाड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# विविध स्पर्धा परीक्षेतील सावळा गोधळ थांबवा!

**अलीकडे** देशातील विविध स्पर्धा परीक्षा तसेच शालेय,महाविद्यालयिन व विद्यापिठीय परीक्षा, शिक्षक भरती साठी व शिक्षकांच्या बढती साठी टीईटी व इतर सर्व परीक्षेच्या प्रश्न पत्रिका परीक्षे आधीच उपलब्ध होत आहे, यामुळे जे हुशार विद्यार्थी कठोर मेहनत करून अभ्यास करतात,रात्रंदिवस अभ्यास करतात त्या विद्यार्थ्यांना या पेपर फुटीमुळे भयंकर मनस्ताप होतो. जे परीक्षार्थी ‘ढ‘, आहेत,ज्यांना विषयांचे कवडीमोल ज्ञान नाही, ज्यांना परीक्षा कशासाठी असते? हे माहीत नाही ,केवळ पैशाच्या जोरावर प्रश्न पत्रिका विकत घ्यायची व सर्वाधिक गुण घेऊन डॉक्टर, इंजिनीअर, वकील,आय.ए.एस, व आय. पी.एस ,अधिकारी,किंवा राज्य शासनाच्या आयोगाच्या तहसीलदार, उपजिल्हाधिकारी, पोलिस

निरीक्षक, गट विकास अधिकारी, कृषी अधिकारी,पोलीस निरीक्षक परीक्षा पास होऊन निष्क्रिय व भ्रष्टाचारी अधिकारी व व्यावसायिक होऊन लोकांच्या जीवनाशी खेळायचे व शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारायचे काम करायचे हे उद्योग करणारे या पेपर फुटीतून निर्माण होतात.व यामुळे देशाचे फार मोठे नुकसान होते. या सर्व प्रकारच्या परीक्षेतिल हा भ्रष्टाचार थांबविण्यासाठी केंद्र सरकार व राज्य शासनाने कठोरात -कठोर कायदे करून या भ्रष्टाचाराला पायबंद घालण्याची वेळ आहे. जे संशयित गुन्हेगार आता पोलिसांच्या ताब्यात आहेत, त्यांची या प्रकरणाच्या मुळा पर्यंत जाऊन सखोल चौकशी करावी व आणखी धागे -दोरे शोधून हा परिक्षातिल भ्रष्टाचार मुळासकट उपटून फेकावा तरच उद्या गुणवंत,ज्ञानवंत,व यशवंत, कर्तव्य निष्ठ अधिकारी ,डॉक्टर,इंजिनीअर, वकील, जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, तहसीलदार पुढे येतील व देशाची धुरा समर्थपणे सांभाळून ही भ्रष्टाचार कीड उखडून फेकतील.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# कर्जमुक्ती योजनेतील प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी

## ई-केवायसी व वारस नोंदीची कार्यवाही गतिमान करा; पीक कर्जवाटप व रोजगार निर्मितीच्या कर्ज प्रस्तावांना गती देण्याचे बँकांना निर्देश

छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ वेळेत मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी बँकांनी ई-केवायसी, आधार प्रमाणीकरण, मयत शेतकऱ्यांच्या वारस नोंदी तसेच डीएलसी पोर्टलवरील प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा. त्याचबरोबर पीक कर्जवाटप आणि मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत पात्र कर्ज प्रस्तावांना गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज बँकांच्या प्रतिनिधींना दिले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ च्या जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत उद्दिष्टयेपूर्तीसाठी बैठक जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृह येथे आज पार पडली. बैठकीत जिल्हाउपनिबंधक समृत जाधव, अर्गणी जिल्हा बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे,कृषी पीक विमा कंपनीचे जिल्हा समन्वयक,सर्व बँकांचे जिल्हा समन्वयक,रिजर्व बँक ऑफ इंडियाचे अधिकारी यांची उपस्थिती होती.

कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी, ई-केवायसी, डीएलसी पोर्टलवरील तक्रारी, मयत शेतकऱ्यांच्या वारस नोंदी, सन २०२६-२७ मधील पीक कर्जवाटप तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या बँकनिहाय कामगिरीचा आढावा घेण्यात आला.

योजनेअंतर्गत दि. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत कर्जवाटप झालेली आणि दि. ३० सप्टेंबर २०२५ व दि. ३१ मार्च २०२६ रोजी थकीत असलेली पात्र कर्जखाती विचारात घेतली जात आहेत. पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्याची तरतूद आहे.

एकवेळ समझोता योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या पात्र शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तसेच सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची उचल करून विहित मुदतीत परतफेड केलेल्या तसेच सन २०२५-२६ मधील पीक कर्जाची विहित मुदतीत परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ अनुज्ञेय आहे.


जिल्ह्यातील बँकांनी १ लाख ९० हजार ७०१ कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. त्यापैकी १ लाख ५१७ कर्जखाती पोर्टलवर प्रसिद्ध झाली आहेत. त्यातील ८४ हजार ५१५ कर्जखात्यांची ई-केवायसी पूर्ण झाली असून उर्वरित खात्यांची ई-केवायसी पूर्ण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

ई-केवायसी करावयाच्या शेतकऱ्यांशी संबंधित बँकांनी संपर्क साधून त्यांना आवश्यक मार्गदर्शन करावे. आधार प्रमाणीकरण व ई-केवायसीची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी. केवळ तांत्रिक अथवा कागदपत्रांशी संबंधित त्रुटींमुळे पात्र शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे जिल्हाधिकारी गौडा यांनी सांगितले.

कर्जमुक्ती योजनेअंतर्गत जिल्हास्तरीय डीएलसी पोर्टलवर प्राप्त तक्रारींचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. पोर्टलवर १४० तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी १२३ तक्रारींचा निपटारा करण्यात आला आहे. उर्वरित तक्रारींच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बँक शाखास्तरावर निकाली काढता येणाऱ्या तक्रारी तेथेच निकाली काढाव्यात. जिल्हास्तरावर प्राप्त होणाऱ्या प्रकरणांमध्ये आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत. संबंधित बँकांनी अशा प्रकरणांवर कालमर्यादेत कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले.

मयत शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांबाबतही बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला. पात्र लाभार्थ्यांच्या यादीतील शेतकरी मयत असल्यास




त्यांचे कर्जखाते केवळ आधार प्रमाणीकरणाअभावी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये. अशा प्रकरणांमध्ये पात्र वारसांची नियमानुसार नोंद करून सुधारित माहिती योजनेच्या पोर्टलवर अपलोड करावी.

वारस नोंदीसाठी आवश्यक आधार कार्ड, बँक पासबुक व अन्य आवश्यक कागदपत्रे संबंधितांकडून घेऊन बँकांनी प्रक्रिया पूर्ण करावी. या प्रक्रियेला गती देण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

सन २०२६-२७ मध्ये जिल्ह्यासाठी खरीप व रब्बी हंगाम मिळून २ हजार ४०० कोटी रुपयांच्या पीक कर्जवाटपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यापैकी खरीप हंगामासाठी १ हजार ५९७ कोटी रुपये, तर रब्बी हंगामासाठी ८०३ कोटी रुपयांचे उद्दिष्ट आहे.

दि. ३१ जुलैअखेर खरीप हंगामात १ हजार १० कोटी ४६ लाख रुपयांचे पीक कर्जवाटप झाले आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ४९० कोटी रुपयांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत ५२२ कोटी ५ लाख रुपयांचे कर्जवाटप करून १०७ टक्के उद्दिष्टपूर्ती केली आहे. राष्ट्रीयीकृत व व्यापारी बँकांनी ८७७ कोटी रुपयांच्या उद्दिष्टापैकी ३८१ कोटी ११ लाख रुपये, तर ग्रामीण बँकेने २३० कोटी रुपयांच्या उद्दिष्टापैकी १०७ कोटी ३० लाख रुपयांचे कर्जवाटप केले आहे.

पीक कर्जवाटपाचे निर्धारित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व बँकांनी विशेष प्रयत्न करावेत. पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज प्रस्तावांवर तत्परतेने कार्यवाही करून कर्जवाटपाला अधिक गती द्यावी, असे जिल्हाधिकारी गौडा यांनी सांगितले.

बैठकीत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत बँकनिहाय कामगिरीचा आढावा घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून युवकांना स्वयंरोजगार व उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. बँकांकडे प्राप्त झालेल्या कर्ज प्रस्तावांची तत्परतेने छाननी करून पात्र प्रस्तावांना कर्जमंजुरी देण्याची कार्यवाही गतिमान करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

कर्ज प्रस्तावांमध्ये कागदपत्रांची अथवा अन्य पूर्तता आवश्यक असल्यास संबंधित अर्जदारांना त्याबाबत मार्गदर्शन करावे. पूर्तता करता येण्यासारख्या बाबींची वेळेत पूर्तता करून घेऊन पात्र प्रस्तावांवर सकारात्मक दृष्टिकोनातून निर्णय घ्यावा. युवकांना उद्योग व स्वयंरोजगारासाठी आवश्यक अर्थसहाय्य वेळेत उपलब्ध होईल, यासाठी बँका आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

कर्जमुक्ती योजना, पीक कर्जवाटप आणि रोजगार निर्मितीशी संबंधित योजनांची प्रभावी अंमलबजावणी शेतकरी व युवकांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. त्यामुळे सर्व बँकांनी संबंधित विभागांशी समन्वय ठेवून योजनांच्या अंमलबजावणीला गती द्यावी. एकही पात्र लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेऊन सर्व प्रकरणांवर कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री.गौडा यांनी दिले.

# विशेष सखोल पुनरिक्षण-२०२६ अंतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

## ३० सप्टेंबरपर्यंत दावे व हरकती दाखल करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण२०२६ अंतर्गत तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी आज प्रसिद्ध करण्यात आली आहे. नागरिकांनी प्रारूप मतदार यादीत आपले नाव असल्याची तसेच नाव, पत्ता, वय, लिंग व अन्य तपशील अचूक असल्याची खात्री करावी. आवश्यक असल्यास दावे व हरकती दि. ३० सप्टेंबरपर्यंत दाखल कराव्यात, असे आवाहन जिल्हा निवडणूक कार्यालयाने केले आहे.

मतदार यादी तयार करण्यासाठी दि. १ ऑक्टोबर २०२६ हा अर्हता दिनांक निश्चित करण्यात आला आहे. या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी दावा करता येईल. तसेच मतदार यादीत समाविष्ट असलेल्या नावाबाबत अथवा नोंदीतील तपशीलाबाबत आक्षेप असल्यास दि. ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत विहित नमुन्यात दावा अथवा हरकत दाखल करता येईल.

**दावे व हरकतींसाठी विहित नमुने**

मतदार यादीत नवीन नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना क्र. ६, मतदार यादीतील नावाच्या समावेशास हरकत घेण्यासाठी अथवा नाव वगळण्यासाठी नमुना क्र. ७, तर मतदार यादीतील नोंदींच्या तपशीलात दुरुस्ती, बदल अथवा अद्ययावत करण्यासाठी नमुना क्र. ८ मध्ये अर्ज करता येईल. हे दावे व हरकती संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे विहित पद्धतीने सादर करता येतील.

**दावे व हरकतींची साप्ताहिक प्रसिद्धी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्राप्त दावे व हरकतींची यादी दर आठवड्याला संबंधित मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच दावे व हरकतींबाबतची माहिती संबंधित मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयात उपलब्ध राहणार आहे. नागरिकांना आपल्या दाव्याची अथवा हरकतीची स्थिती संबंधित निवडणूक कार्यालयाकडून तपासता येईल.

**निर्णयाविरुद्ध अपीलची तरतूद**

मतदार नोंदणी अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुद्ध लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम २४ (अ) अन्वये जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करता येईल. प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध कलम २४ (ब) अन्वये द्वितीय अपील करण्याची तरतूद आहे. द्वितीय अपील मतदार नोंदणी नियम, १९६० मधील विहित पद्धतीनुसार मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दाखल करता येईल.

दावे व हरकतींवरील निर्णयाविरुद्धचे अपील निर्णय जाहीर झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत विहित पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, छत्रपती संभाजीनगर तर द्वितीय अपीलसाठी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सक्षम प्राधिकारी आहेत.

**मतदारांनी नोंदींची पडताळणी करावी**

प्रारूप मतदार यादी प्रत्येक पात्र नागरिकाच्या मतदानाच्या अधिकाराच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. त्यामुळे नागरिकांनी मतदार यादीतील आपले नाव आणि अन्य तपशील तपासावेत. पात्र असूनही नाव समाविष्ट नसल्यास विहित कालावधीत दावा दाखल करावा. तसेच आक्षेपार्ह अथवा अपात्र नोंद आढळल्यास त्याबाबत हरकत नोंदवावी.

प्रारूप मतदार यादी संबंधित मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे पाहता येईल. तसेच भारत निवडणूक आयोगाच्या मतदार सेवा पोर्टल वरही मतदार यादीची पडताळणी करता येईल.

सर्व पात्र नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपली नोंद तपासावी आणि मतदार यादी अचूक व अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेत सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक कार्यालयाने केले आहे.

# माता रमाई योजना लाभार्थी यांनी आपल्या घरावर योजनेचा बोर्ड लावावा त्यानंतरच योजनेचा शेवटचा हफ्ता देण्यात यावा; समिती सभापती यांचे आदेश

## गलिच्छ वस्ती निर्मूलन, घर बांधणी व समाज कल्याण समितीची बैठक संपन्न

छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या गलिच्छ वस्ती निर्मूलन घर बांधणी व समाज कल्याण समितीची बैठक आज मनपा मुख्यालय येथे पार पडली. मुख्यालयातील प्रशासकीय सभागृह येथे सभापती जालिंदर शेंडगे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस स.सदस्य अशोक दामले ,काकासाहेब काकडे,मीना खरात,भाग्यश्री साळवे,अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे,उप आयुक्त सविता सोनवणे,समाज कल्याण विभाग सहायक अधिकारी सीमा सिंदीकर,समाज विकास विभाग अधिकारी विनोद परदेशी ,माता रमाई व र्जेब चे अभियंता ,कर्मचारी यांची उपस्थिती होती.

या बैठकीत माता रमाई घरकुल योजनेसाठी महानगरपालिके अंतर्गत पीएमसी नियुक्ती करणे संदर्भात चर्चा करणे. माता रमाई घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना शासन निर्णयानुसार ५० टक्के अनुदान वाटप करणे याबाबत. स. सदस्य काकासाहेब काकडे यांनी लाभार्थ्यांच्या संदर्भात काही त्रुटी असल्याचे पत्र दिले होते त्या अनुषंगाने कोणत्या स्वरूपात कारवाई करण्यात आलेली आहे याबाबत. माता रमाई घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या अर्जामध्ये काही त्रुटी असलेल्या नागरिकांचे काय करणार याची माहिती देण्यात यावी. माता रमाई घरकुल योजनेत आपत्र करण्यात आलेल्या नागरिकांकडून पडताळणी करून त्याची पूर्तता करणे व त्यांना पात्र करणे याबाबत कारवाई करणे बाबत चर्चा. माता रमाई घरकुल योजनेअंतर्गत ज्या नागरिकांना अगोदर नोटीस देण्यात आल्या होत्या त्यांनी स्वतःच्या खर्चाने घर बांधले आहेत काही नाही बेसमेंट कॉलम इत्यादी बांधकाम करण्यात आले आहे त्यांचे काय करणार याबाबत. प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये थर्ड पार्टी ऑडिट मध्ये विभागाकडून कोणत्या प्रकारची कारवाई प्रस्थापित करण्यात आली आहे.प्रधानमंत्री आवास योजनेमधील मा.पालिका सदस्य ऋषिकेश जैस्वाल यांनी निकृष्ट दर्जाचे बांधकामाबाबत आरोप केलेले आहेत याबाबत अहवाल देणे. प्रधानमंत्री आवास योजनेतील कंत्राटदार यांच्या बाबतीत सविस्तर माहिती देणे. या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रशासनाच्या वतीने या सर्व प्रश्नांवर खुलासा करण्यात आला. यात माता रमाई घरकुल योजनेसाठी इश्ण नियुक्त करणे संदर्भात sop व work फ्लो निश्चित करण्यात आला आहे.या करिता ०६ अभियंता यांची नियुक्ती करण्यात आली असून ऑन लाइन दाखल झालेल्या अर्जांची छाननी करण्यात येऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात येणार आहे. यानंतर पुढील कारवाई साठी सहायक आयुक्त समाज कल्याण विभाग यांचे कडे वर्ग करण्यात येणार आहे. या सर्व प्रक्रिये बाबत स.सदस्यांनी समाधान व्यक्त केले. स.सदस्य अशोक दामले यांनी जर हे काम असे सुरळीत पार पडत असेल तर इश्ण नियुक्ती करण्याची गरज नाही असे स्पष्ट केले.

तसेच स.सदस्य काकासाहेब काकडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर निर्णय देताना मां.सभापती यांनी १०१ बोगस लाभार्थी यांची यादी स.सदस्य यांनी द्यावी व प्रशासनाच्या वतीने एक समिती नियुक्त करून दोषी अधिकारी कर्मचारी यांच्यावर उचित कारवाई करण्याचे निर्देश दिले.

माता रमाई घरकुल योजना अंतर्गत लाभार्थ्यांना शासन निर्णयानुसार ५०टकके अनुदान वाटप करणे संदर्भात मां.पालकमंत्री महोदय यांच्या सूचनेनुसार सुरुवातीला २०टक्के Besment लेवल ३०टक्के स्लॅब लेवल ४०टक्के पूर्ण बांधकाम झाल्यावर उर्वरित १०टक्के रक्कम देण्यात येणार आहे. याच प्रश्नावर स.सर्व सदस्य यांनी माता रमाई घरकुल योजना लाभार्थी यांनी आपल्या घरावर योजनेचा लाभ घेतल्याचा बोर्ड लावावा यानंतर सबंधित लाभार्थी यांना उर्वरित रक्कम अदा करण्यात यावी अशा सूचना केल्या.यावर सभापती यांनी स.सदस्य यांनी केलेल्या सूचनांवर निर्णय देताना लाभार्थी यांनी आपल्या घरावर योजनेचा लाभ घेतला असल्याचा बोर्ड लावावा यानंतर सबंधित लाभार्थी यांना शेवटचा हफ्ता देण्यात यावा असे आदेश दिले.

तसेच ऑन लाइन अर्ज भरताना कोणत्याही दलाल यांच्या अमिषाला बळी न पडता नागरिकांनी मनपा कार्यालय किंवा समाज कल्याण व विभाग येथे प्रत्यक्ष येऊन अर्ज दाखल करावा.या करिता दोन्ही ठिकाणी कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहे. या विषयाच्या अनुषंगाने सभापती यांनी लवकरात लवकर एक खिडकी योजना सुरू करण्याचे निर्देश दिले. स.सदस्य अशोक दामले यांनी दिव्यांग यांना ख्ण्ण साठी त्रास न देता त्यांना ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आवश्यक ती मदत करावी अशी सूचना केली. याबाबत समिती सभापती यांनी वरील सर्व विषयी योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले.

# मनपातील सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना आयुक्त अमोल येडगे यांच्या शुभेच्छा; दीर्घकाळ केलेल्या सेवेसाठी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने कृतज्ञता

छत्रपती संभाजीनगर दि.३१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये प्रदीर्घ काळ सेवा बजावून दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सेवानिवृत्त झालेल्या १४ अधिकारी व कर्मचाऱ्यांना महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

महानगरपालिकेच्या सेवेत कार्यरत असताना या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी शहराच्या विकासासाठी तसेच नागरिकांना विविध नागरी सुविधा व सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेमुळे महानगरपालिका प्रशासनाच्या कामकाजाला बळ मिळाले असून, त्यांच्या सेवेबद्दल प्रशासनाच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये प्रामुख्याने पुढील अधिकाऱ्यांचा समावेश आहे :

मनोज हरेंद्र गजे – उपसंचालक, नगररचना विभाग

अनिलकुमार अण्णासाहेब तनपुरे – कार्यकारी अभियंता (स्थापत्य), ड्रेनेज विभाग

विजय करभारी गोर – कार्यकारी अभियंता (स्थापत्य)

वसंत भाये – कार्यकारी अभियंता (स्थापत्य), पाणीपुरवठा विभाग

या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यकाळात विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजात तसेच शहराच्या विकास प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावली.




यावेळी मनोगत व्यक्त करताना आयुक्त अमोल येडगे म्हणाले की, 'सेवानिवृत्तीनंतर आपल्या सेवाकाळात ज्या गोष्टी किंवा छंद पूर्ण करता आले नाहीत, त्यासाठी आता वेळ द्यावा. आपल्या आवडी-निवडी जोपासाव्यात आणि कुटुंबीयांसोबत आनंदी जीवन जगावे.'

'आरोग्य हीच खरी संपत्ती असून, सेवानिवृत्तीनंतर दररोज किमान एक तास आपल्या आरोग्यासाठी द्यावा. नियमित व्यायाम, चालणे आणि आरोग्याची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. पुढील वाटचाल आनंदी, निरोगी आणि समाधानकारक जावी, यासाठी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा,' असेही आयुक्त येडगे यांनी सांगितले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांपैकी अनिल तनपुरे, सुभाष सावंत आणि मुमताज बेगम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महानगरपालिका सेवेत काम करतानाचे अनुभव आणि आठवणी उपस्थितांसमोर मांडल्या.

महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने सर्व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचे त्यांच्या प्रदीर्घ सेवेसाठी आभार व्यक्त करण्यात आले. तसेच त्यांच्या पुढील आयुष्यासाठी निरोगी, आनंदी व सुखी जीवनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

# हेमंत हरिश्चंद्रराव दाभाडे यांचे अपघाती निधन



वैजापूर दि.३१ (प्रतिनिधी)- येथील रहिवाशी व संभाजीनगरच्या बजाज कंपनीत ऑपरेटर म्हणून कार्यरत असलेले हेमंत हरिश्चंद्रराव दाभाडे यांचे सोमवार(ता,३१)रोजी पहाटे साडेपाच वाजता ते ज्या ट्रॅव्हलस ने प्रवास करीत होते ती ट्रॅव्हलस समृद्धी महामार्गावर उभ्या असलेलेल्या कंटेनर ला जाऊन धडकली त्यात हेमंत दाभाडे हे दाराजवळ उभे असल्याने धडक झाल्या बरोबर ट्रॅव्हलसमध्ये खाली पडले त्यांच्या छातीला व डोक्याला मार लागल्याने जागेवरच गतप्राण झाले.मृत्यू समयी ते ५३ वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पांच वाजता येथील अमर धाम मध्ये अंतिम संस्कार करण्यात आले.या प्रसंगी मेजर सुभाष संचेती ,माजी नगराध्यक्ष राजूसिंह राजपूत, विजय जाधव चिकटगावकर,ठा,धोंडीराम सिंह राजपूत, डॉ.धुळे, सचिन जोशी,गोकुळ भुजबळ, बजाज युनियनचे अध्यक्ष विजय पवार, सराफा संघटनेचे गिरीश चापानेरकर यांनी श्रद्धांजली अर्पण केली. पुणे,नाशिक,संभाजीनगर,येथील बजाज चे अधिकारी ,कामगार उपस्थित होते. हेमंत दाभाडे यांच्या मागे पत्नी,एक मुलगा, व एक मुलगी असा परिवार आहे.कै,हेमंत दाभाडे हे सेवा निवृत्त लिपिक हरिश्चंद्र दाभाडे यांचे सुपुत्र होते.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-Tender Notice**

MSETCL invites online bids (E-Tender) for following Tender Available at: **http://srmetender.mahatransco.in due date for online submission: 01.09.2026, 00:01hr to 08.09.2026, 23:59 hrs.**

| S.N. | Tender No. & Description |
| --- | --- |
| 1 | **RFx No. 7000041056 2nd Call** SRM Tender for Work of Providing & Applying of High Insulation Resistance Compound Coating having Di-electric Strength more than 82 kV/mm on Tertiary Side Equipment's of 765/400 kV 2x1500 MVA ICTs like 33 kV PT, BPI, IPS Tubes, LA & Tertiary Bushing etc., for prevention of unwanted tripping of ICTs on NDR at 765 KV RS Division, Ektuni of amount **Rs. 48,57,450/- EMD Rs. 48,575/- Tender Fees Rs.: 590/-** |

**Contact Person:-** DyEE (Office) 765 kV Ektuni S/s -
**Contact No.:** 8554994585

**Executive Engineer**
**765 kV RS Division, Ektuni**

# भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ अन्वये घोषणा

जा.क्र.२०२६/भूसं/कौ. ल. सि. त./सी.आर/०१/२०२५,

**कौडगाव लघु सिंचन तलाव, मौजे कौडगाव अंबड/कान्होळ, ता. जि. छत्रपती संभाजीनगर**

## अधिसुचना

ज्या अर्थी, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी खालील अनुसूची- एक मध्ये नमुद केलेल्या जमिनी भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ अन्वये, मौजे कौडगाव अंबड/का-होळ, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथील कौडगाव लघू सिंचन तलाव करीता जमिन संपादन करणे या कामासाठी या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्याची किंवा असण्याची शक्यता असल्या बाबतची प्राथमिक अधिसूचना शासन राजपत्र क्र. ३४, गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट २१-२७, २०२५, पृष्ठे ५६, पान क्र. २००८ ते २००९ वर प्रसिध्द झालेली आहे.

ज्या अर्थी, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रसिध्द केलेल्या सदर प्राथमिक अधिसूचनेवर आजपर्यंत एकही हरकत प्राप्त झालेली नाही.

उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी अनुसूची एक मध्ये नमुद जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे, या बाबत समुचित शासन तथा जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांची अशी खात्री झाली आहे. त्यामुळे उक्त अधिनियमाच्या कलम १९ पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसन क्षेत्र म्हणून निर्धारीत केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या ३ च्या खंड (ग) अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना पदनिर्देशीत केलेले आहे.

सदर जमीनींचे नकाशे व अन्य अभिलेख कार्यालयीन वेळेत उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात अवलोकनार्थ उपलब्ध राहतील.

**अनुसूची - एक**
**जमिनीचे वर्णन**

गाव : कौडगाव अंबड तालुका: छत्रपती संभाजीनगर जिल्हा : छत्रपती संभाजीनगर

| अनु क्रमांक | गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टर) |
| --- | --- | --- |
| १ | ९२ पैकी | ३.५३ |
| २ | ९२ पैकी | ९.७८ |
| | **एकुण** | **१३.३१** |

गाव : काहोळ तालुका : छत्रपती संभाजीनगर जिल्हा: छत्रपती संभाजीनगर

| अनु क्रमांक | गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टर) |
| --- | --- | --- |
| १ | ६५ पैकी | २.२९ |
| २ | ६५ पैकी | ०.९१ |
| ३ | ६५ पैकी | १.०८ |
| ४ | ६५ पैकी | १.०३ |
| ५ | ६५ पैकी | ०.८७ |
| ६ | ६५ पैकी | १.९० |
| | **एकुण** | **८.०८** |
| | **एकुण एकंदर** | **२१.३९** |

**अनुसूची - दोन**

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण.

प्रकल्पाचे नाव :- कौडगाव लघु सिंचन तलाव, मौजे कौडगाव अंबड, कान्होळ ता. जि. छत्रपती संभाजीनगर.
प्रकल्पाचे वर्णन :- कौडगाव लघू सिंचन तलाव, मौजे कौडगाव अंबड, कान्होळ ता. जि. छत्रपती संभाजीनगर.
समाजाला मिळणारे लाभ : सिंचन सुविधा.

**अनुसूची - तीन**

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे : विस्थापनाची आवश्यकता नाही.
सबब माहीती निरंक.

**अनुसूची - चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश : महाराष्ट्र शासन, राजपत्र दिनांक १३.०३.२०१५ व २६.०४.२०१८ अनुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण II व III मधील तरतुदी लागू करण्यापासून सुट प्राप्त.

**अनुसूची - पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील :-**
**अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांचे पदनाम** :- निरंक
**ब. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता** :- निरंक
**क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील** :- निरंक

**स्वाक्षरीत/-**
**(डॉ. व्यंकट कंठीराम राठोड)**
**उपविभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर**

**स्वाक्षरीत/-**
**(विनय गौडा जी सी, भाप्रसे)**
**जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर**

जिमाका/छ.स.न/जाहि/१७८/२०२६-२०२७